


पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक २४४ ■ शनिवार, दि. १४ मार्च २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

गर्व से कहो हम हिन्दु है।

॥ विराट हिन्दु सम्मेलन ॥

हिन्दू जागरण की दिशा को नई उर्जा एवं चेतना प्रदान करने हेतु सर्व हिन्दु समाज द्वारा सनातन संस्कृति, सनातन धर्म एवं सामाजिक एकता के प्रतीक "विराट हिन्दु सम्मेलन" का आयोजन किया जा रहा है। आपकी उपस्थिती आयोजन की गरीमा बढायेगी और समाज में नई उर्जा का संचार होगा।

आइए इस धर्मजागरण के महापर्व में पूरे परिवार के साथ सम्मिलीत होकर धर्म की पताका आगे लहराते है।

रविवार दि. १५ मार्च २०२६
शाम ६:०० बजे
स्थान : श्री शक्तीधाम मंदिर, गिता नगर, अकोला

॥ कलश यात्रा ॥
रविवार दि. १५/३/२०२६ शाम ५:०० बजे ।
आरंभ : श्री शिवशंकर मंदिर दुबे एस.टी.डी. के पास से..
समारोप : श्री शक्तीधाम मंदिर, गिता नगर, अकोला

## गांधी रोडवरील ६ दुकाने खाक, १ कोटींचे नुकसान!

# अकोल्यात अग्नी तांडव !

### अग्निशमन दलाची दिरंगाईवरून आ. वसंत खंडेलवाल यांनी फायर ऑफिसरला झाप झाप-झापले







प्रतिनिधी १४ मार्च

**अकोला :** शहरातील अतिशय गजबजलेल्या गांधी रोड परिसरातील सिटी कोतवाली पोलीस स्टेशनला लागून असलेल्या ६ दुकानांना शनिवारी पहाटे भीषण आग लागली. या आगीत व्यापाऱ्यांचे अंदाजे १ कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. अग्निशमन दलाच्या संथ कारभारामुळे ही हानी वाढल्याचा आरोप संतप्त व्यापाऱ्यांनी केला आहे. अवघ्या अर्धा किलोमीटरवर अग्निशमन केंद्र असतानाही यंत्रणा वेळेवर न पोहोचल्याने महापालिकेच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

### नेमकी घटना काय ?

शनिवारी पहाटे ३ वाजेच्या सुमारास ही आग लागली. आगीने रौद्ररूप धारण केल्याने बाबा ड्रेसेस, दत्त फ्रेम, पूजा इलेक्ट्रिकल, साई फ्रेम, श्री फ्रेम आणि आशा स्टोअर्स ही दुकाने पूर्णपणे जळून खाक झाली. तसेच चुन्नू-मुन्नू व अंदाज डिझायनर या दुकानांनाही आगीची मोठी झळ बसली. दुकानांमध्ये फोटो फ्रेम आणि पुठ्ठा यांसारखा ज्वालाग्राही माल असल्याने आग वेगाने पसरली. दुपारपर्यंत या ठिकाणी आग धुमसत होती, जी विझवण्यासाठी ३० बंबांचा वापर करावा लागला.

### आगीमागे घातपाताचा संशय?

या घटनेला घातपाताची जोड असल्याची चर्चा सध्या शहरात रंगली आहे. घटनास्थळा शेजारील 'बिंदी घर'चे अतिक्रमण आदल्या दिवशीच काढण्यात आले होते, त्या दुकानाला काहीही झाले नाही. जवळच असलेल्या दर्ग्यालाही आगीची झळ पोहोचली नाही. यामुळे ही आग लागली की लावली गेली? असा संशय व्यापाऱ्यांनी व्यक्त केला आहे. परिसरातील ज्वेलर्सच्या दुकानांवरील सीसीटीव्ही फुटेज पोलिसांनी तपासण्याची मागणीही केली आहे.











### व्यापाऱ्यांना शासनाने मदत करावी

नुकसानग्रस्त व्यापाऱ्यांना शासनाकडून तात्काळ आर्थिक मदत मिळावी. या भीषण आगीत कंवर गोपालदास संतांनी, धर्मेंद्र आनंदानी, पननदास आनंदानी, ओमप्रकाश, गिरीश भाई टकरानी, शेख सादिक आणि शेख फैजान या व्यापाऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. आगीचा पंचनामा करत शासनाने विशेष बाब म्हणून आर्थिक मदत करण्याची गरज व्यक्त केली. राज्य सरकारने याविषयी मदत करणे अपेक्षीत असून महापालिकेने या घटनेची चौकशी करण्याची गरज आहे. याविषयी आम्ही प्रशासन व सत्तापक्षाकडे मागणी करू.

**- सुनील इन्नानी**
नगरसेवक, मनपा, अकोला.



### अग्निशमन विभागाचे 'अपयश' की 'अडथळे'?

अग्निशमन केंद्राच्या नाकाखाली ही घटना घडली असतानाही वेळेवर मदत न मिळाल्याने व्यापारी संतप्त आहेत. वीज पुरवठा खंडित असल्याने हायड्रंटवरून पाणी घेता आले नाही, असे कारण विभागाकडून देण्यात आले. परिणामी, सुरुवातीला एमआयडीसीमधून गाड्या मागवाव्या लागल्या. 'आम्ही नियमित कर भरतो, मग संकटाच्या वेळी ही यंत्रणा कुचकामी का ठरते?' असा सवाल व्यापाऱ्यांनी विचारला आहे.

### स्फोटांच्या आवाजाने परिसर हादरला

प्रत्यक्षदर्शींच्या माहितीनुसार, आग लागल्यानंतर पहाटे दोन मोठे स्फोट झाले. हे आवाज बस स्टँड परिसरापर्यंत ऐकू आले. दुकानांच्या मागे असलेल्या ऑम्लेटच्या गाडीवरील सिलिंडरचा हा स्फोट असावा, असा प्राथमिक अंदाज वर्तवण्यात येत आहे.

CLASSIFIED

**प्लॉट प्लॉट प्लॉट**
नवीन लेआउट तपस्या नगरी फक्त २,५०,०००/- च्या ३ सोप्या किस्ती ११ महिने मुदत मधे प्लॉट
पत्ता :- मौजे मालेगाव, हनुमानगडी समोर, छत्री तलाव रोड दस्तुर नगर अमरावती
अधिक माहिती साठी संपर्क
मो. 8263923606
7757905649

**फ्लॅट फ्लॅट फ्लॅट**
नवीन कंस्ट्रक्शन रेडी टू मूव फ्लॅट
अमरावतीच्या मधोमध तेही आपल्या बजट मधे फक्त १६,९९,९९९/- मधे नवीन बांधकाम मधे फ्लॅट
पत्ता:- देसाई लेआउट, गणेश कॉलनी जवळ राजापेठ, अमरावती
अधिक माहिती साठी संपर्क
मो. 8468872250
8788432278

**२ बीएचके फ्लॅट विकणे आहे**
सेकंड फ्लोअर, पूर्वमुखी, ८५० स्क्वेअर फूट, सेमी फर्निश, स्वतंत्र पार्किंग, हवेशीर प्रशस्त ४५ लाख निगोशिएबल, 'रचना पाम' वरदविनायक अपार्टमेंट, गनेडीवाल लेआऊट, क्यांम्प, अमरावती.
संपर्क
7038424614
9823077585

**सेल्समॅन पाहिजे**
सन ऑप्टिकल मध्ये ई कॉमर्स ऑपरेटर ऑप्टिकल सेल्समॅन पाहिजे
- भेटण्याची वेळ दुपारी १२ ते ५
- संपर्क-
मो. 8888867287

**भाड्याने देणे आहे**
महिला व मुलीसाठी एक रुम बाथरुम संडास अटॅच एक दुकान १० बाय १० रोड टच भाड्याने देणे आहे.
- पत्ता-
जवाहर गेट, परकोटच्या आत साबनपुरा, अमरावती.
9403005251

## गॅस कनेक्शन बंद होण्याची भीती दाखवून ३० लाखांचा गंडा!

प्रतिनिधी १४ मार्च

**मुंबई :** सध्या गॅस पाईपलाईन कनेक्शन बंद होईल अशी भीती दाखवून सायबर फसवणुकीचे प्रकार वाढले आहेत. मोबाईलवर संदेश किंवा कॉल करून नागरिकांना फसवले जात असल्याचे उघड झाले आहे. मुंबई आणि डोंबिवलीमध्ये गेल्या चार दिवसांत अशा प्रकारे सहा नागरिकांची तब्बल ३० लाख रुपयांची ऑनलाईन फसवणूक करण्यात आली आहे.

मुंबईतील विलेपार्ले आणि वडाळा परिसरात चार वृद्ध नागरिकांना लक्ष्य करत चोरट्यांनी ऑनलाईन फसवणूक केली. दरम्यान, डोंबिवलीत दोन दिवसांत दोन महिलांचीही फसवणूक झाल्याची घटना समोर आली आहे. गॅस कनेक्शन बंद होईल असे सांगून केवळ १० रुपयांचे ई-चलन भरण्यास सांगितले गेले. मात्र, लिंकवर क्लिक करताच एका महिलेच्या खात्यातून सुमारे एक लाख रुपये काढून घेण्यात आले, तर दुसऱ्या महिलेची जवळपास तीन लाख रुपयांची फसवणूक करण्यात आली. या प्रकरणी अज्ञात आरोपीविरोधात डोंबिवलीतील रामनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस पुढील तपास करत आहेत. नागरिकांनी अशा फसव्या कॉल्स आणि लिंकपासून सावध राहावे, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

## घरगुती गॅसचे 5 लाख 31 हजार 746 ग्राहक !

### ३४ गॅस एजन्सीमार्फत गॅस वितरण, रोजचे वितरण ८ हजार ९८८, शिल्लक साठा १३ हजार ६००

प्रतिनिधी १४ मार्च

**अकोला :** जिल्ह्यात ३४ गॅस एजन्सीजमार्फत नियमित व उज्ज्वला घरगुती गॅसच्या ५ लाख ३१ हजार ७४६ ग्राहकांना गॅसचा पुरवठा करण्यात येतो. दररोज ८ हजार ९८८ घरगुती गॅसधारकांना वितरण करण्यात येत असून, २०३ व्यावसायिकांनाही पुरवठा करण्यात येतो. हे सर्व करूनही १३ हजार ६०० गॅस सिलिंडरचा पुरवठा शिल्लक राहत आहे. त्यामुळे नागरिकांनी विनाकारण गर्दी करू नये, सर्वांना आणि सुरळीत घरगुती गॅस सिलिंडरचा पुरवठा होणार असल्याचे जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांनी सांगितले आहे. ही आकडेवारी १३ मार्चला जाहीर करण्यात आली आहे.

इराण- अमेरिका-इस्त्राइल युद्धाचे पडसाद सर्वत्र उमटत असून त्याची झळ इंधनाच्या रूपाने भारतातील



गावखेड्यांना बसत आहे. व्यावसायिकसह घरगुती गॅसचाही तुटवडा निर्माण झाला असून त्यावर निर्बंध आलेले आहेत. या पार्श्वभूमीवर अकोला जिल्ह्यात परिस्थिती नियंत्रित असून जिल्हावासीयांसाठी घरगुती गॅसचा पुरेसा पुरवठा असल्याचे जिल्हा पुरवठा विभागाच्यावतीने सांगण्यात येत आहे. तसेच घरगुती सिलिंडरचा काळाबाजार रोखण्यासाठी आता ९ पथकेही गठीत केली आहेत. त्यामुळे काळाबाजार किंवा साठेबाजी करणारांवर धडक कारवाई करण्यात येणार आहे.

जिल्ह्यात एचीपीसीएल कंपनीचे १० वितरक असून त्यांच्याकडे नियमित लाभार्थी १ लाख ४३ हजार ८०३ तर उज्ज्वला गॅसचे ५५ हजार ४४३ लाभार्थी आहेत. तसेच बीपीसीएल कंपनीचे ८ वितरक असून, ते नियमित ९९ हजार ६१६ तर उज्ज्वलाच्या ३१८८१ ग्राहकांना गॅस पुरवठा करतात. त्याचप्रमाणे आयओसीएलचे १६ वितरक असून, नियमित १ लाख ५१ हजार ६२६ व उज्ज्वलाच्या ४९ हजार ३३७ ग्राहकांना घरगुती गॅसचा पुरवठा करीत असतात. या तिन्ही कंपनीच्या एकूण ५ लाख ३१ हजार ७४६ ग्राहकांना दररोज ८ हजार ९८८ सिलिंडरचे वाटप होत आहे. तर शिल्लक साठा १३ हजार ६०० एवढा असून, २०३ व्यावसायिकांनाही व्यावसायिक सिलिंडरचा पुरवठा करण्यात येत आहे.

### गॅस सिलिंडरचा काळाबाजार केल्यास कडक कारवाई

जिल्ह्यातील घरगुती गॅस सिलिंडरचा काळाबाजार रोखण्यासाठी ९ पथके गठित करण्यात आली आहेत. त्यांच्यामार्फत जिल्ह्यातील तालुकानिहाय गॅस एजन्सीची वेळोवेळी तपासणी करण्यात यावी, अवैधरीत्या घरगुती वापराचे गॅस सिलिंडरचा वापर व्यावसायिक ठिकाणी होत असल्याचे किंवा साठवणूक होत असल्याचे आढळून आल्यास त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी. त्या कारवाईचा अहवाल वरिष्ठ स्तरावर पाठविण्यात यावा, असेही आदेश पत्रात जिल्हा पुरवठा अधिकारी रवींद्र यन्नावार यांनी म्हटले आहे.

सिटी न्यूज अमरावती
शनिवार, दि. १४ मार्च २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

# अमरावतीत २४ मार्चला भव्य रोजगार मेळावा; टीसीएस मध्ये नोकरीची संधी

**अमरावती:** नोकरीच्या शोधात असलेल्या सुशिक्षित तरुण-तरुणींना नामांकित खासगी कंपन्यांमध्ये रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र आणि मॉडेल करिअर सेंटर, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने येत्या २४ मार्च २०२६ रोजी 'पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे' आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्याचे मुख्य आकर्षण म्हणजे 'टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस' (टीसीएस) ही नामांकित कंपनी या मेळाव्यात प्रत्यक्ष उपस्थित राहून उमेदवारांची निवड करणार आहे. स्थानिक तसेच इतर जिल्ह्यातील नामवंत कारखाने आणि उद्योगसमूहांच्या माध्यमातून युवकांना स्वावलंबी बनवण्याच्या उद्देशाने हा मेळावा आयोजित केला आहे. टीसीएस कंपनीला आवश्यक असणाऱ्या विविध पात्रतेच्या पदांसाठी कंपनीचे प्रतिनिधी प्रत्यक्ष उपस्थित राहून उमेदवारांच्या लेखी परीक्षा व मुलाखती घेतील. विशेष म्हणजे, मुलाखत देऊन पात्र ठरणाऱ्या उमेदवारांना लगेचच नोकरीची संधी उपलब्ध करून दिली जाणार आहे.

# अमरावतीमधील मॉसिकॉल संस्थेची जागा खाजगी व्यक्तीला विकल्यास अमरावतीकरांचा जनाक्रोश होईल- आ.संजय खोडके

प्रतिनिधी १४ मार्च

## ♦ मॉसिकॉलची २५ एकर जागा शासकीय कारणास्तव आरक्षित करण्याबाबत शासनाने तातडीने कार्यवाही करण्याची लक्षवेधी




**अमरावती:** अमरावती शहराच्या मध्यस्थानी असलेली मॉसिकॉल संस्थेची जागा वर्ष १९९३ ला कॉटन फेडरेशनकडे हस्तांतरित झाल्या नंतर कॉटन फेडरेशन ने अधिक भागभांडवल प्राप्त करण्याचे अनुषंगाने अमरावती येथील मॉसिकॉलची २५ एकर शासकीय जागा विक्री करण्यासंदर्भात दोनवेळा निविदा प्रक्रिया जारी केली आहे. अमरावती शहराचा वाढता विस्तार लक्षात घेता सार्वजनिक वापरासाठी अथवा शासकीय कारणास्तव उपयोगात आणण्यासाठी शहराच्या मध्यभागात कुठेही जागा उपलब्ध नाही. म्हणून मॉसिकॉलची जागा कोणत्याही परिस्थितीत अमरावतीकर जनता विकू देणार नसून , तसे झाल्यास अमरावतीमध्ये नागरिकांचा असंतोष वाढेल, म्हणून मॉसिकॉलची जागा विक्रीसाठी काढण्यात आलेली निविदा प्रक्रिया रद्द करून हि जागा शासकीय कारणास्तव आरक्षित करण्याबाबत शासनाने तातडीने कार्यवाही करण्याची लक्षवेधी महाराष्ट्र विधान परिषद सदस्य आ.संजय खोडके यांनी राज्यविधीमंडळात दाखल केली.

अधिवेशनाच्या वरिष्ठ सभागृहामध्ये सुरु असलेल्या कामकाजा दरम्यान आ संजय खोडके यांनी सांगितले कि, अमरावती येथे कापूस पणन महासंघाच्या अंतर्गत असलेल्या महाराष्ट्र राज्य तेल बियाणे वाणिज्य आणि औद्योगिक महामंडळ मर्यादित अर्थात मोसीकॉल' या फॅक्टरीची सुमारे २५ एकर मोकळी जागा असून सदर जागा वर्ष यापूर्वीही विक्रीसाठी काढण्यात आलेली आहे. परंतु तांत्रिक बाबींचा विचार करून त्यावेळी सदर प्रक्रिया थांबविण्यात आली. मात्र आता पुन्हा एकदा मॉसिकॉलची २५ एकर शासकीय जागा विक्रीसाठी काढण्यात आली असून त्यासाठी नव्याने निविदा प्रसिद्ध करण्यात आल्याचे नुकतेच माहे जानेवारी-फेब्रुवारी, २०२६ दरम्यान निदर्शनास आले आहे. सदर जागा ही अमरावती शहराच्या मोक्याच्या ठिकाणी असून भविष्यात अमरावती जिल्हा स्तरावरील विविध शासकीय-प्रशासकीय किंवा सार्वजनिक सुविधांसाठी या जागेचा अत्यंत प्रभावी वापर होऊ शकतो. ही बाब शासनाने विचारात घेणे महत्वाचे आहे. त्यामुळे हि शासकीय मालकीची जागा खाजगी व्यक्तींना देण्यापेक्षा ती भविष्यातील गरजेसाठी आरक्षित ठेवावी, अशी आग्रही मागणी आ. संजय खोडके यांनी सभागृहासमक्ष लावून धरली. अमरावतीमधील स्थानिक जनतेकडूनहि याबाबत सातत्याने मागणी होत असूनही याकडे शासनाचे होत असल्याने स्थानिक अमरावतीकर नागरिकांमध्ये तीव्र असंतोष व नाराजीची भावना उमटू लागली आहे. असे सभागृहाला अवगत करीत जनहिताचा विचार करून मॉसिकॉलच्या जागेबाबत वर्ष २०२६ मध्ये सध्याची नवीन निविदा प्रक्रिया तात्काळ रद्द करून मॉसिकॉलची २५ एकर जागा शासकीय कारणास्तव आरक्षित करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना करण्याची लक्षवेधी सुचना आ. संजय खोडके यांनी लावून धरत शासनाचे लक्ष वेधले.

यावर उत्तर देतांना राज्याचे पणन मंत्री जयकुमार रावल यांनी सांगितले कि, मॉसिकॉल या संस्थेची आर्थिक स्थिती अतिशय बिकट झाल्यामुळे वर्ष १९९३ मध्ये मॉसिकॉलमधील शासनाचे भागभांडवलासह सर्व मालमत्ता आर्थिक उत्तरदायित्वासह महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघास देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार अमरावती येथील मॉसिकॉलच्या कारखान्याची सुमारे २५ एकर मोकळी जमीन विक्रीसाठी काढण्यात आली. त्याकरीता यापूर्वी चार वेळा ई-निविदा प्रसिद्ध करण्यात आल्या होत्या.

सन २०१५ मध्ये राबविण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेमध्ये प्राप्त झालेला उच्चतम दर रुपये १६१ कोटी इतका होता. परंतु निविदाधारक यांच्याकडून निविदेतील अटी व शर्तीनुसार वेळेत पूर्ण रक्कम जमा न केल्यामुळे वर्ष २०१९ रोजी मॉसिकॉलच्या संचालक मंडळाने निविदाधारकाने जमा केलेली सुरक्षा अनामत रक्कम जप्त करुन सदर निविदा रद्द करण्याबाबत ठराव पारित केला. अशातच मॉसिकॉल चे व्यवस्थापकीय संचालक यांनी दिनांक १९.०५.२०२५ च्या पत्रान्वये मॉसिकॉलच्या मालकीच्या मालमत्तांच्या विक्रीसाठी प्रकल्प सल्लागाराची नियुक्ती करणेबाबतचा प्रस्ताव सादर केला असता मॉसिकॉलच्या मालमत्तांच्या विक्रीशी संबंधित सर्व कार्यासाठी मे. सिकॉम लि. यास प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नियुक्त करण्यास मान्यता देण्यात आली. तसेच दिनांक २७.११.२०२५ रोजी सदर जागेच्या विक्रीकरिता ई-निविदा प्रक्रिया राबविण्यास मान्यता देऊन जानेवारी २०२६ मध्ये निविदा प्रक्रिया राबविण्यात आली.

# आरसा ग्रुपची आणखी एक यशस्वी सामाजिक झळाळी

प्रतिनिधी १४ मार्च

## ♦ महिला दिनानिमित्त गाडगे नगर पोलीस स्टेशनमध्ये महिला पोलीस कर्मचाऱ्यांचा सत्कार



**अमरावती :** ८ मार्च जागतिक महिला दिनाच्या औचित्याने गाडगे नगर पोलीस स्टेशन, अमरावती येथे कार्यरत सर्व महिला पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांचा आरसा ग्रुप महिला सामाजिक संस्थेच्या वतीने सत्कार करण्यात आला.

समाजरक्षण, कायदा व सुव्यवस्था राखणे तसेच महिलांच्या सुरक्षेसाठी अहोरात्र कार्य करणाऱ्या महिला पोलीस कर्मचाऱ्यांच्या कार्याचा गौरव करण्याच्या उद्देशाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या प्रसंगी महिला पोलीस निरीक्षक (PI) मा. विजया पंधरे, सहाय्यक पोलीस निरीक्षक (API) मा. वैशाली चव्हाण, पोलीस उपनिरीक्षक (PSI) मा. सुषमा आठवले, मा. सोनाली सोनवणे तसेच मा. आरती गवई यांचा सत्कार करण्यात आला.

तसेच महिला पोलीस हवालदार (hC) मा. माधुरी साबळे तसेच महिला पोलीस शिपाई प्रणाली ढोले, सुजाता गवई, कविता सोळंके, वंदना चव्हाण, शितल ढवरे, नीलिमा सलीम, स्वाती कळस्कर, वर्षा गारुडे, माया चापले, कविता शिरसाट, गायत्री झनके, वैशाली जाधव, सोनू तायडे, शितल धवलपुरे, सुरेखा ढोके आदी महिला कर्मचाऱ्यांचा शाल, पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी वरिष्ठ पोलीस अधीक्षक शिंदे साहेब, वरिष्ठ पोलीस निरीक्षक गोरखनाथ जाधव तसेच पोलीस निरीक्षक विजया पंधरे यांनी आपल्या मनोगतात आरसा ग्रुपच्या उपक्रमाचे कौतुक केले. कुटुंबाची जबाबदारी सांभाळत वर्दीत राहून समाजाच्या सुरक्षेसाठी धैर्याने कार्य करणाऱ्या महिला पोलीस कर्मचाऱ्यांचे योगदान प्रेरणादायी असल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमास मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे आयोजन आरसा ग्रुप महिला सामाजिक संस्थेच्या पदाधिकारी, प्रतिनिधी व बचतगट सदस्य महिलांच्या वतीने करण्यात आले.

# अमरावती महानगरपालिकेची HPV लसीकरण मोहीम; आयसोलेशन येथे उत्स्फूर्त प्रतिसाद

प्रतिनिधी १४ मार्च



**अमरावती :** अमरावती महानगरपालिकेच्या आरोग्य विभागामार्फत मुलींमध्ये गर्भाशय मुखाच्या कर्करोगाविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि त्यापासून संरक्षण देण्यासाठी HPV (ह्युमन पॅपिलोमा व्हायरस) लसीकरण मोहिमेचे आयोजन करण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत UPhC आयसोलेशन सेंटरमध्ये लसीकरण कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला.

या कार्यक्रमाचे उद्घाटन अमरावती महानगरपालिकेचे उपमहापौर मा. सचिन भेंडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी अमरावती महानगरपालिकेचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. विशाल काळे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमादरम्यान आरोग्य विभागातील अधिकारी, वैद्यकीय कर्मचारी तसेच आरोग्य सेविका मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

HPV हा विषाणू महिलांमध्ये गर्भाशय मुखाच्या कर्करोगास कारणीभूत ठरणाऱ्या प्रमुख घटकांपैकी एक मानला जातो. त्यामुळे लहान वयातच मुलींना HPV लस देणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे आरोग्य तज्ज्ञांचे मत आहे. या पार्श्वभूमीवर अमरावती महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाने शहरातील विविध भागांमध्ये लसीकरण मोहीम राबविण्याचा पुढाकार घेतला आहे.

बडनेरा येथे आयोजित करण्यात आलेल्या या लसीकरण मोहिमेत १४ वर्षांखालील अनेक मुलींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. पालकांनीही आपल्या मुलींना लस देण्यासाठी सकारात्मक प्रतिसाद देत या उपक्रमाला सहकार्य केले. लसीकरणाबाबत आरोग्य कर्मचाऱ्यांनी उपस्थित पालकांना व मुलींना HPV विषाणू, त्याचे परिणाम आणि लसीकरणाचे महत्त्व याबाबत माहिती दिली.

# गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाला रोखण्यासाठी एचपीव्ही लस पूर्णपणे सुरक्षित

## ♦ अफवांवर विश्वास ठेवू नका जिल्हा प्रशासनाचे आवाहन

प्रतिनिधी १४ मार्च

**अमरावती :** महिलांमध्ये वाढणाऱ्या गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाला प्रभावीपणे रोखण्यासाठी जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागातर्फे 'जिल्हास्तरीय एचपीव्ही लसीकरण' मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला आहे. नुकतेच आष्टी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात या मोहिमेचे उद्घाटन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. प्रवीण पारिसे आणि जिल्हा माता व बालसंगोपन अधिकारी डॉ. हर्षल क्षीरसागर यांच्या हस्ते करण्यात आले. डॉ. प्रवीण पारिसे यांनी सोशल मीडियावरून पसरवल्या जाणाऱ्या चुकीच्या माहितीचे आणि अफवांचे खंडन केले. त्यांनी स्पष्ट केले की, कोणतीही लस सर्वसामान्यांना देण्यापूर्वी तिच्या अनेक स्तरांवर कठोर वैद्यकीय चाचण्या घेतल्या जातात आणि ही लस सर्व निकषांवर यशस्वी ठरली आहे. त्यामुळे पालकांनी कोणत्याही निराधार अपप्रचाराला बळी न पडता आपल्या मुलींच्या सुरक्षित भविष्यासाठी या मोहिमेत सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले. आरोग्य विभागातर्फे जिल्ह्यातील १४ ते १८ वर्षे वयोगटातील मुलींच्या पालकांसाठी ही एक सुवर्णसंधी असल्याचे सांगण्यात आले असून, ही लस गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगासारख्या जीवघेण्या आजारापासून कायमचे संरक्षण मिळवून देते.

# पीएम मित्रा टेक्सटाईल पार्कच्या पायाभूत सुविधांचा पहिला टप्पा पूर्ण

प्रतिनिधी १४ मार्च

## ♦ केंद्रीय सचिव नीलम शमी राव यांनी केली पाहणी



**अमरावती:** अतिरिक्त अमरावती औद्योगिक क्षेत्र, नांदगाव पेठ येथे नव्याने विकसित होत असलेल्या 'पीएम मित्रा टेक्सटाईल पार्क'ला आज भारत सरकारच्या वस्त्रोद्योग मंत्रालयाच्या सचिव नीलम शमी राव यांनी भेट देऊन पाहणी केली. देशातील सात राज्यांमध्ये विकसित होणाऱ्या टेक्सटाईल पार्क्सपैकी अमरावती येथील पायाभूत सुविधांचा पहिला टप्पा यशस्वीरित्या पूर्ण झाल्याबद्दल त्यांनी यावेळी विशेष समाधान व्यक्त केले. या महत्त्वपूर्ण दौऱ्यादरम्यान महाराष्ट्र शासनाचे उद्योग सचिव मा. डॉ. पी अन्बलगन, विभागीय आयुक्त श्वेता सिंघल, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी. वेलरासू यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी एमआयडीसीचे सह मुख्य कार्यकारी अधिकारी अजित कुंभार यांनी सादरीकरणाद्वारे प्रकल्पाच्या प्रगतीचा आढावा सादर केला. एकूण १ हजार २० एकर क्षेत्रावर विस्तारलेल्या या पार्कमध्ये रस्ते, सांडपाणी निचरा व्यवस्था, केबलिंग, पथदिवे, पाणीपुरवठा यंत्रणा आणि सांडपाणी शुद्धीकरण प्रकल्प पूर्णतः कार्यान्वित झाले आहेत. विशेष म्हणजे, या प्रकल्पात १०० एकर क्षेत्रावर एमआयडीसीतर्फे सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यात येणार आहे. तसेच, या प्रकल्पात नेदरलँडमधील 'मेसर्स टिटिवायएम मॅनेजमेंट बी.व्ही.' या कंपनीद्वारे कापूस प्रक्रिया आणि संशोधन व विकास केंद्र स्थापन करण्यासाठी ६६ एकर जमिनीवर पहिली परकीय गुंतवणूक करण्यात येत असल्याची माहिती देण्यात आली. दौऱ्यादरम्यान जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी जिल्ह्यातील एकूण औद्योगिक विकास आणि या प्रकल्पामुळे स्थानिक स्तरावर निर्माण होणाऱ्या मोठ्या प्रमाणावरील रोजगाराच्या संधींविषयी माहिती दिली. या कार्यक्रमाला केंद्र सरकारचे वस्त्रोद्योग संचालक अनिल कुमार, सहसंचालक विनय मिश्रा आणि नागपूरचे वस्त्रोद्योग आयुक्त संजय दैने उपस्थित होते. कार्यक्रमामध्ये एमआयडीसी नागपूरचे मुख्य राजेश झंझाड यांनी आभार मानले.

# महापौर श्रीचंद तेजवाणी यांची नूतन मूकबधिर व स्पेशल स्कूलला सदिच्छा भेट



प्रतिनिधी १४ मार्च

**अमरावती :** मंदबुध्दी व शारीरिक अपंग विकास संस्था, इंदला फाटा, मार्डी रोड, अमरावती येथे नूतन मूकबधिर विद्यालय व विद्यापीठ स्पेशल स्कूलसाठी आयोजित कार्यक्रमाला अमरावती नगरीचे प्रथम नागरिक मा.महापौर श्रीचंद तेजवाणी तसेच मा. राजु कुरील हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

या भेटीद्वारे संस्था व विद्यालयातील विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना प्रोत्साहन देण्यात आले. संस्था अध्यक्ष डॉ. संजय गुडधे यांनी मान्यवर पाहुण्यांचे शाल व श्रीफळ देऊन सत्कार केला. यावेळी महामहीम राष्ट्रपतींच्या कार्यक्रमात द्विभाषिक म्हणून कार्य करणारे श्री. निरज तिवारी यांचा देखील सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाला स्टेट बँक ऑफ इंडियाचे मॅनेजर मा. अमेय कुलकर्णी तसेच मोहोड सर उपस्थित होते.

सिटी न्यूज सुपरफास्ट

## खामगाव

# घरगुती गॅसचा व्यावसायिक वापर केल्यास कडक कारवाई : तहसिलदारांचा इशारा

प्रतिनिधी १४ मार्च




**खामगाव :** शहरासह तालुक्यातील हॉटेल, ढाबे व इतर व्यावसायिक प्रतिष्ठानांमध्ये घरगुती गॅस सिलिंडरचा अवैध वापर आढळल्यास संबंधितांवर जीवनावश्यक वस्तू कायदा १९५५ अंतर्गत कडक कारवाई करण्यात येईल, असा इशारा खामगावचे तहसीलदार सुनील पाटील यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिला आहे.

जिल्हाधिकारी कार्यालय बुलढाणा यांच्या निर्देशानुसार तालुकास्तरीय विशेष दक्षता पथकाची स्थापना करण्यात आली आहे. या पथकाद्वारे तालुक्यातील गॅस एजन्सी व पेट्रोल पंपांची अचानक तपासणी करण्यात येणार आहे.

प्रशासनाकडून खामगाव शहर व तालुक्यातील सर्व गॅस एजन्सी, पेट्रोल पंप चालक, हॉटेल, उपहारगृह, ढाबा मालक तसेच मंगल कार्यालय चालकांना स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत. व्यावसायिक कारणांसाठी घरगुती गॅसचा वापर करणे हा कायद्याने गुन्हा असून असे आढळल्यास संबंधितांविरुद्ध कठोर कारवाई केली जाईल.

**दक्षता पथकाची करडी नजर**

तहसिलदारांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त करण्यात आलेले विशेष पथक तालुक्यातील गॅस एजन्सी व पेट्रोल पंपांची तपासणी करणार आहे. या तपासणीदरम्यान अनियमितता, साठेबाजी किंवा नियमभंग आढळल्यास संबंधित मालकांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात येतील.

# पंचपरिवर्तन मूल्यांचा अंगीकार करणे ही काळाची गरज - गोपाल सोनकुसरे

प्रतिनिधी १४ मार्च



**खामगाव :** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त सकल हिंदू समाजाच्या वतीने हनुमान वस्ती सती फैल भागात ८ मार्च रोजी छत्रपती शिवाजी महाराज नगर परिषद शाळा क्रमांक २ च्या मैदानावर 'हिंदू संमेलन' झाले. संमेलनाची सुरुवात प्रमुख वक्ते खामगाव जिल्हा प्रचारक गोपाल सोनकुसरे, परब्रम्ह सदगुरु सिद्ध चैतन्य शिवाचार्य महाराज (साखरखेर्डा), साध्वी त्रिवेणी देशमुख (वृंदावन, छत्रपती संभाजीनगर) यांच्या उपस्थितीत गोमाता, भारत माता आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून करण्यात आले. यावेळी प्रमुख वक्ते गोपाल सोनकुसरे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त हिंदू समाज संघटित व्हावा या उद्देशाने सकल हिंदू समाजाच्या वतीने हिंदू संमेलनाचे आयोजन संपूर्ण भारतभर करण्यात आले आहे. त्यांनी पंचपरिवर्तन या संकल्पनेवर विशेष भर देत सामाजिक समरसता, पर्यावरण संरक्षण, कुटुंब प्रबोधन, स्व-आधारित जीवनशैली आणि नागरिक कर्तव्ये या पाच मूल्यांचा समाजाने अंगीकार करून त्यानुसार आचरण करणे ही आजच्या काळाची गरज असल्याचे नमूद केले. पंचपरिवर्तनातून समाजात सकारात्मक बदल घडवून आणण्याचे आवाहन त्यांनी उपस्थितांना केले.

यावेळी सदगुरु सिद्धचैतन्य शिवाचार्य महाराज व साध्वी त्रिवेणी देशमुख यांचे मार्गदर्शन लाभले.

संमेलनापूर्वी परिसरातून भव्य शोभायात्रा काढण्यात आली. या शोभायात्रेत गजानन महाराज महिला भजनी मंडळाच्या महिला सहभागी झाल्या. मिरवणुकीत रामदरबाराचे आकर्षक दर्शन घडविण्यात आले. तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांच्या वेशभूषेत श्रीकांत खडसे, महाराणा प्रताप यांच्या वेशभूषेत पृथ्वीसिंग ठाकूर तर झाशीची राणी लक्ष्मीबाई यांच्या वेशभूषेत विधी परदेशी यांनी सहभाग घेतला. पारंपरिक वेशभूषेमुळे ही शोभायात्रा विशेष आकर्षण ठरली. नागरिकांनी ठिकठिकाणी शोभायात्रेचे स्वागत केले.

# भीषण अपघातात दोन ठार!

## ♦ ४ बकऱ्याही मृत्यूमुखी

प्रतिनिधी १४ मार्च



**खामगाव:** टाइल्सची वाहतूक करणाऱ्या ट्रकने बकऱ्या घेऊन जाणाऱ्या समोरील ट्रकला धडक दिल्याने एकाचा जागीच, तर दुसऱ्याचा रुग्णालयात नेत असताना मृत्यू झाला. ही घटना अकोला मार्गावरील वरखेडनजीक शुक्रवारी घडली. या अपघातात चार बकऱ्यांचा मृत्यू झाला. प्राप्त माहितीनुसार, बकऱ्या वाहून नेणारा ट्रक खामगावहून अकोल्याच्या दिशेने जात होता. त्याचवेळी टाइल्सने भरलेल्या भरधाव ट्रकने समोरील ट्रकला पाठीमागून जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की, दोन्ही वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. या अपघातात इकबाल अली खान (२२, रा. नयना, किशनगड, राजस्थान) यांचा जागीच मृत्यू झाला, तर मोसम खान अशरूप खान (३२, रा. डवका, किशनगड, राजस्थान) यांचा रुग्णालयात नेत असताना मृत्यू झाला. त्याचवेळी ट्रकमधील चार बकऱ्यांचा जागीच मृत्यू झाला, तर चार बकऱ्या गंभीर जखमी झाल्याचे समजते. घटनेची माहिती मिळताच पोलिस घटनास्थळी दाखल झाले. स्थानिकांच्या मदतीने मृतदेह खामगाव येथील सामान्य रुग्णालयात हलविण्यात आले

## शहरात अस्वच्छता पसरविणाऱ्यांना मनपा स्वच्छता विभागाव्दारे १८,६०० रूपये दंड

**अकोला:** शहराची स्वच्छता राखण्यासाठी आणि कचरा व्यवस्थापन अधिक प्रभावी करण्यासाठी महानगरपालिका आयुक्त डॉ.सुनील लहाने यांच्या आदेशान्वये झोन निहाय व्यावसायिक व नागरिकांवर कचरा घंटा गाडीचा वापर न करता परिसरात अस्वच्छता पसरविणा-यांना स्वच्छता विभागाव्दारे १८,६००/- रुपयांचा दंड केला.

अकोला महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांनी तसेच व्यावसायिकांनी आपल्या घरात व प्रष्ठिानात निघणारा ओला व सुका कचरा वेग-वेगळा गोळा करून परिसरात किंवा ईतरत्र न टाकता फक्त मनपाच्या कचरा घंटा गाडी मध्येच कचरा टाकून आपले परिसर स्वच्छ ठेवावे असे आवाहन अकोला महानगरपालिका प्रशासनाव्दारा करण्यात येत आहे.

### कविता

**सुट्टीची मजा**

सुट्टीच मजा खुप खुप येते
जेव्हा मामाच्या गावी मी जाते

आज्जी देते लिमलेटच्या गोळ्या
मावशी लाटते पुरणपोळ्या

मावशीच्या बाळांशी कीत्ती खेळतो
नाचतो गातो धिंगाणा घालतो

आईस्क्रीम लस्सी गारेगार
मामाचा रुबाब झुपकेदार

आजोळी करून मज्जाच मज्जा
वाढवीतो परतून गुणांचा दर्जा



सौ. भावना अजय इटकीकर

## स्वच्छ आणि सुंदर बसस्थानक मोहिमेत 'संपर्क यंत्रणा' कोलमडलेली

प्रतिनिधी १४ मार्च

**अकोला:** प्रवाशांना माहिती मिळवण्यासाठी एसटी महामंडळाच्या संकेतस्थळावर दिलेले आगार आणि बसस्थानकांचे संपर्क क्रमांक मोठ्या प्रमाणात बंद किंवा त्यावरून प्रतिसाद मिळत नसल्याचे समोर आले आहे. प्रवाशांच्या या गंभीर समस्येवर प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी १३ मार्च रोजी पत्रकार परिषद घेतली. आली. 'सुराज्य अभियाना'ने एसटी प्रशासनाचा भोंगळ कारभार समोर आणला.

नाशिक, पुणे, सोलापूर, मुंबई, कोल्हापूर, नागपूर, अमरावती, गडचिरोली सह राज्यात इतर ठिकाणी विभाग नियंत्रक यांच्या माध्यमातून परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांना निवेदन देऊन प्रवाशांची

**◆ सुराज्य अभियानची पत्र परिषदेत माहिती**



अडचण सोडवण्याची मागणी करण्यात आली.

अकोला जिल्ह्यातील तेल्हारा, अकोट, मूर्तिजापूर यांसह वाशिम, कारंजा आणि रिसोड यांसारख्या महत्त्वाच्या स्थानकांचीही हीच दयनीय अवस्था आहे.

तसेच हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ आणि सुंदर बसस्थानक अभियानांतर्गत केवळ रंगरंगोटी करून किंवा पारितोषिके देऊन चालणार नाही, तर प्रवाशांना मिळणारी 'प्रत्यक्ष सेवा'अधिक महत्त्वाची आहे. प्रवाशांना सुविधाच मिळत नसेल, तर या संदर्भातील वर्षानुवर्षे दिलेली रक्कम संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांकडून व्याजासहित का वसूल केली जाऊ नये? असा प्रश्न 'सुराज्य अभियाना' च्या अधिवक्ता तथा जिल्हा समन्वयक श्रुती भट यांनी उपस्थित केला आहे.

बंद लँडलाईनचे तांत्रिक कारण आता नको तर त्याला पर्याय म्हणून प्रत्येक बस स्थानक आणि डेपोसाठी अधिकृत भ्रमणभाष क्रमांक त्वरित उपलब्ध करून देण्यात यावा. त्यांची माहिती त्वरित संकेतस्थळावर अद्ययावत करण्यात यावी. अशी अपेक्षा श्रीमती श्रुती भट यांनी व्यक्त केली.

पत्रकार परिषदेला सामाजिक कार्यकर्ते प्रा. हरिदास ठाकरे, हिंदू जनजागृती समितीचे विदर्भ समन्वयक श्रीकांत पिसोळकर, जिल्हा समन्वयक अमोल वानखडे उपस्थित होते.

## सर्व्हायकल कॅन्सर टाळण्यासाठी लसीकरण सुरक्षित

प्रतिनिधी १४ मार्च

**अकोला:** एचपीव्ही लस सर्व्हायकल कॅन्सर (गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग) टाळण्यासाठी अत्यंत प्रभावी आहे, या लसीकरणाचे कोणतेही दुष्परिणाम नसून, लस अत्यंत सुरक्षित आहे. लसीकरणाविषयीचे गैरसमज दूर व्हावेत यासाठी व्यापक जनजागृती करून लसीकरण कार्यक्रम यशस्वीपणे राबवावा, असे निर्देश जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी आज येथे दिले. एचपीव्ही लसीकरणाच्या अनुषंगाने बैठक जिल्हाधिका-यांच्या अध्यक्षतेत त्यांच्या दालनात झाली, त्यावेळी त्या बोलत होत्या.

जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बळीराम गाढवे, माता व बालसंगोपन अधिकारी डॉ. विनोद करंजीकर, डॉ. मेश्राम, महिला व बालविकास अधिकारी राजश्री कोलखेडे आदी उपस्थित होते.

एचपीव्ही लस ही चौदा वर्षे वय पूर्ण झालेल्या व पंधरा वर्षांआतील मुलींना दिली जाणार आहे. जिल्ह्यात ९ हजार २९ विद्यार्थीनी पात्र आहेत. आरोग्य संस्थांच्या माध्यमातून लसीकरण होणार आहे. सर्व्हायकल कॅन्सर व भविष्यातील धोके टाळण्याच्या दृष्टीने लस सुरक्षित व उपयुक्त आहे. या लसीमुळे कुठलाही धोका दुष्परिणाम उद्भवत नाही.

## सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त कुंभारीत गावातील जेष्ठ मातृशक्तीचा सत्कार

**अकोला :** क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीचे औचित्य साधत अकोला पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या कुंभारी येथे जेष्ठ मातृशक्तीचा सन्मान सोहळा भावनिक वातावरणात पार पडला. आयुष्यभर कुटुंब, संस्कार आणि समाजघडणीसाठी योगदान देणाऱ्या जेष्ठ महिलांना मानाचा मुजरा करत हा प्रेरणादायी उपक्रम राबविण्यात आला. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उपतालुकाप्रमुख तथा कुंभारीचे माजी सरपंच बाळासाहेब अतकरे यांच्या पुढाकारातून १० मार्च २०२६ रोजी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बाळासाहेब अतकरे होते. यावेळी कुंभारीच्या सरपंच ऋषीकन्या बाळासाहेब अतकरे, माजी सरपंच यशवंतराव शिरसागर, शासनाचा आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त श्रीकृष्ण बिडकर गुरुजी, सैय्यद महबूब, यांची प्रमुख उपस्थिती होती.

## अल्पवयीन मुलीवर अत्याचार करणाऱ्या आरोपीचा जमानत अर्ज न्यायालयाने फेटाळला

प्रतिनिधी १४ मार्च

**अकोट:** तेल्हारा पोलिस स्टेशन अंतर्गत अल्पवयीन मुलीवर अत्याचार करून तिच्यावर मातृत्व लादणारा आरोपी शिवम फाटे याचा जमानत अर्ज अतिरिक्त जिल्हा व विशेष सत्र न्यायाधीश बी.एम. पाटील यांनी फेटाळला.

या प्रकरणात सरकारी वकील अजित देशमुख यांनी न्यायालयात युक्तिवाद केला की, पिडीता तेल्हारा येथे घरात भाडयाने राहत असतांना तिच्या घरासमोर शिवम विजय फाटे हाही राहत होता. घरासमोरेच राहत असल्याने त्याची व पिडीतेची ओळख झाली. २०२२ मधे दत्त जयंतीचे दिवशी मुलगी घरी एकटी असतांना शिवम फाटे याने तिच्यावर अत्याचार केला. तसेच कोणाला काही सांगितले तर मारुन टाकीन अशी धमकी दिली. त्यानंतर तिच्यावर दोन-तीन वेळा बळजबरी केली. २०२५ च्या हिवाळयामध्ये शुभमने पुन्हा अत्याचार केला. त्यामुळे ती सध्या २ महिन्याची गर्भवती आहे. तिने तिच्या मोठ्या बहिणीला, आई वडीलांना सांगितले. आहे. पिडीतेच्या जबानी रिपोर्ट वरुन गुन्हा दाखल करुन तपासात घेण्यात आला.

सरकारी वकील अजित देशमुख यांनी युक्तीवाद केला की, दोषारोपपत्रामध्ये आरोपी विरूध्द सबळ पुरावा आहे. पिडीत मुलीचे न्यायदंडाधिकारी यांचे समक्ष देखील पोलीसांनी बयाण नोंदविले. अशा प्रकरणात आरोपीला जामीनावर सोडले पीडित मुलीच्या जिवितास आरोपी कडून धोका होऊ शकतो. या प्रकरणात आरोपीला कारागृहामध्ये ठेवून प्रकरण चालविण्यात यावे. दोन्ही बाजू ऐकून न्यायालयाने आरोपीचा जामीन फेटाळला.

## गुणवंत महाराज संस्थानात होणार महाप्रसाद वितरण

प्रतिनिधी १४ मार्च

**हिवरखेड:** येथील तिडके यांच्या शेतातील संत गुणवंत महाराज संस्थान येथे संत शेषनाग अवतार गुणवंत महाराज प्रगट दिनानिमित गुरुवार १९, मार्चला महाप्रसाद वितरीत करण्यात येणार आहे. भाविकांनी दर्शनाचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा. १८ ला गुंतवत महाराज यांची भव्य पालखी मिरवणूक गावातून काढण्यात येणार यामध्ये भाविकांनी सामिल व्हावे असे आवाहन टी पॉईंट हिवरखेड भक्तजन सेवा समिती कडून करण्यात आले आहे.

## लोहारा ग्रामपंचायतीतील ३४ लाखांचा अपहार उघड तत्कालीन सरपंच व सचिव विरोधात गुन्हा दाखल

प्रतिनिधी १४ मार्च

**हातरूण:** लोहारा ग्रामपंचायतील ३४ लाख रुपयांचा अपहाराचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी तत्कालीन सरपंच आणि ग्राम सचिव यांच्याविरोधात उरळ पोलिस स्टेशन मध्ये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार सन २०२३ मधे ग्रामपंचायतीच्या विविध विकास योजनांच्या निधीचा गैरवापर करूण अपहार करण्यात आल्याचा आरोप ग्राममस्था कडून करण्यात आला होता. या संदर्भात




संबंधित अधिकाऱ्याकडे तक्रार दाखल केल्या नंतर प्रकरणाची गंभीर दखल घेण्यात आली. दरम्यान उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार बाळापूर पंचायत समितीची चौकशी समिती स्थापन करण्यात आली. या समितीन चॉकशी केली. निधी अपहारा बाबत संशयास्पद नोंदी आढळुन आल्याचे तपासात स्पष्ट झाल्याची माहिती पंचायत समितीच अधिकाऱ्यांनी दिली आहे

त्यानंतर पंचायत समितिच्या अधिकाऱ्यांनी उरळ पोलिस स्टेशन मध्ये तक्रार दाखल केली होती. या तक्रारीच्या आधारे ठाणेदार पंकच कांबडे यांनी कलम ४२० आणि ३४ अंतर्गत गुन्हा नोंद केला आहे.

### निधन वार्ता

**बृजलता जाजू**



**अकोला :** जिल्ह्यात सहकारी गृहनिर्माण व गृहतारण संस्थांचे मजबूत जाळे तयार करणारे स्व. शिवरतन जाजू यांच्या पत्नी बृजलता जाजू यांचे आज, १४ मार्च रोजी सकाळी निधन झाले. त्यांच्या मागे सून आरती जाजू, तीन मुली, जावई आणि मोठा आप्तपरिवार आहे. माहेश्वरी समाजात त्यांचे योगदान होते.

## राष्ट्रवादी शेतकरी उपजिल्हाध्यक्षपदी राम मंगळे यांची नियुक्ती

प्रतिनिधी १४ मार्च

**अकोट:** अकोट तालुक्यामधील उमरा या गावचे प्रतिष्ठित तथा माजी सरपंच राम मंगळे यांची राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे प्रदेशाध्यक्ष तथा शेतकरी संघटनेचे मार्गदर्शक वसंतराव मानकर यांनी राष्ट्रवादी शेतकरी संघटनेच्या उपजिल्हाध्यक्षपदी नियुक्ती केली आहे. राम मंगळे यांची गेल्या ढगफुटीमध्ये शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसान भरपाईसाठी त्यांनी आमरण उपोषण च्या माध्यमातून शेतकऱ्यांना खूप मोठा दिलासा दिला आहे ढगफुटीमध्ये गोरगरीब नागरिकांना तसेच बेलुरा गावातील व सर्कल मधील काही गावांना घरगुती उपयुक्त किराणा



किट व साहित्य वाटप सुद्धा केले आहे कबड्डी स्पर्धकांना प्रोत्साहित करणे त्यांना टी-शर्ट ओळखपत्र आदिवासी भागात आरोग्य शिबिर मोफत औषध वाटने बैलगाडा शर्यती शेतकऱ्यांना सन्मान करणे त्याचबरोबर संपूर्ण उमरा सर्कल मध्ये नागरिकांच्या आरोग्याच्या हिताचे पाऊल दोन रुग्णवाहिका त्यांनी मोफत मध्ये चालू केले आहेत, राम मंगळे हे सामाजिक, शैक्षणिक तसेच गावच्या विकासकामांमध्ये नेहमीच सक्रिय राहिले आहेत. गावातील विविध उपक्रम, शेतकरी प्रश्न आणि सर्वसामान्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी त्यांनी सातत्याने पुढाकार घेतला आहे. या निवडीमुळे उमरा सर्कल परिसरातील राष्ट्रवादी कार्यकर्त्यांमध्ये उत्सवाचे वातावरण निर्माण झाले आहे त्यांच्या याच कार्याची दखल घेत वसंतराव मानकर यांनी त्यांच्यावर ही महत्त्वाची जबाबदारी सोपवली आहे. या नियुक्तीमुळे शेतकरी संघटनेच्या कामाला अधिक गती मिळेल, तसेच ग्रामीण भागातील समस्या प्रशासनापर्यंत प्रभावीपणे पोहोचवण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त होत आहे. परिसरातील सामाजिक कार्यकर्ते व शेतकरी बांधवांना या नियुक्ती बद्दल अभिनंदन करून उत्सवाचे वातावरण व विविध स्तरातून त्यांच्या अभिनंदनचा वर्षा होत आहे.

## महिला बचत गटांना कृषी अवजार बँकेसाठी २४ लाखांपर्यंत अनुदान

प्रतिनिधी १४ मार्च

**अकोला:** नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यांतर्गत अकोला जिल्ह्यातील महिला बचत गटांना कृषी व्यवसायात भरारी घेण्याकरिता अर्थसहाय्य उपलब्ध होणार आहे. या योजनेतून गावपातळीवर 'कृषी अवजार बँक' स्थापन करण्यासाठी प्रकल्प मूल्यांच्या ६० टक्क्यांपर्यंत, कमाल २४ लाख रुपयांपर्यंत अनुदान दिले जाणार आहे. या उपक्रमासाठी प्रकल्प गावातील उमेद, माविम पुरस्कृत व इतर महिला बचत गट तसेच महिलांचे गाव संघ पात्र राहतील.

या योजनेचा लाभ घेण्यासाठी संबंधित गटात वेगवेगळ्या कुटुंबातील किमान १० सदस्य असणे अनिवार्य आहे. विशेष म्हणजे, ज्या गटांनी यापूर्वी इतर कोणत्याही शासकीय योजनेतून कृषी अवजार बँकेचा लाभ घेतला आहे, त्यांना या प्रक्रियेत सहभागी होता येणार नाही. एका गावात एकाच महिला गटाला लाभ देता येईल. त्यामुळे जर एकाच गावातून एकापेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाले, तर लाभार्थीची निवड लॉटरी पद्धतीने केली जाईल. प्रकल्पाचे मूल्य २० लाख रुपयांपेक्षा जास्त असल्यास, राष्ट्रीयकृत बँकेकडून ७५ टक्के कर्ज घेणे बंधनकारक आहे. निवड झालेल्या गटांना ट्रॅक्टर व ट्रॅक्टर चलित अवजारे, बीबीएफ यंत्र, रोपणी व लावणी यंत्र, मल्चिंग मशीन, कम्बाइन हार्वेस्टर आणि फवारणी पंप यांसारखी आधुनिक यंत्रसामग्री खरेदी करता येईल. इच्छुक महिला गटांनी प्रकल्पाच्या अधिकृत पोर्टलवर ५ एप्रिल २०२६ पर्यंत ऑनलाईन नोंदणी करून अर्ज सादर करावेत अधिक माहितीसाठी प्रकल्प गावातील समूह सहायक व स्थानिक कृषी कार्यालयाशी संपर्क साधावा असे आवाहन 'आत्मा', अकोला कार्यालयाचे प्रकल्प संचालक डॉ. मुरली इंगळे यांनी केले आहे.

## लेखी आश्वासनानंतर मुंडगाव येथील आमरण उपोषणाची सांगता

प्रतिनिधी १४ मार्च

**अकोट:** अकोट तालुक्यातील संत नगरी म्हणून ओळख मुंडगाव येथील रोड वरील अतिक्रमणे हटविण्याची व वणी वारुळा ते वरवट हा रस्ता अंदाजपत्रकानुसार करण्यात यावा या साठी मुंडगाव येथील ४ ग्रामस्थ आमरण उपोषणाला बसले होते.

त्या बाबतीत वृत्तपत्रांमध्ये या बाबतीत बातम्या प्रसिद्ध झाल्या त्यांची दखल घेत तेल्हारा येथील सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागीय अभियंता धनंजय बर्डे यांनी उपोषण कर्ते यांची भेट घेऊन अतिक्रमणे काढून लेखी आश्वासन दिले नंतर अकोट ग्रामीण पोलीस निरीक्षक किशोर जुनघरे व नायब तहसीलदार मनोज मानकर,

ग्राम महसुल अधिकारी आशेर परमार्थ यांच्या उपस्थितीत शरबत देऊन उपोषणाची सांगता करण्यात आली.

उपोषणा दरम्यान मागण्या केलेल्या सर्व मागण्या उपविभागीय अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग तेल्हारा यांनी मान्य केल्या. सदर मागण्यांमध्ये दोन्ही बाजूने प्रत्येकी १२ मीटर पर्यंतचे



अतिक्रमण काढण्यात आले. तसेच ७ मीटर पर्यंत डांबरीकरण व अडीच मीटर पर्यंत पेवर ब्लॉक व ११ फुटावर नाली बांधकाम करण्यात येईल. प्रवाशी निवारा मूळ ठिकाणी कायम ठेवण्यात येतील. सोबत अनेक मागण्या मान्य करण्यात आल्या आहेत.यावेळी उपोषण करते श्रीकृष्ण वाघ, प्रभाकर भालेराव, संतोष सदार, योगेश गावंडे यांचे उपोषण सोडवायला कार्यकारी अभियंता काकड, ठाणेदार किशोर जुनघरे, ज्ञानेश्वर दहिभात, अँड देवानंद फुसे, दीपक मुंडोकार, कैलास थोटे,आकाश पेढेकर तंटामुक्ती अध्यक्ष, चंद्रशेखर चितोडे, प्रमोद वकारे, उपसरपंच अनिल गाढे, ग्रामपंचायत सदस्य अरविंद फुसे, जुगलकिशोर चिंचोलकार, तुषार पाचकोर, सदस्य पती पोहोरकार, शेख अजिज, गवई व एकता ऑटो रिक्षा युनियन व समस्त गावकऱ्यांच्या उपस्थितीत उपोषण उपविभागीय अधिकारी धनंजय बर्डे यांनी शरबत पाजून उपोषण सोडण्यात आले.

यावेळी पोलीस निरीक्षक किशोर जुनघरे यांनी पोलिस बंदोबस्त तैनात केला होता. तसेच या साठी सार्वजनिक बांधकाम विभागाचे कर्मचारी व महसुल कर्मचारी, ग्रामपंचायत सदस्य यावेळी उपस्थित होते.

## समाजाच्या सृजनतेसाठी कीर्तन महोत्सवाची उपयुक्तता- हभप जगन्नाथ महाराज पाटील

प्रतिनिधी १४ मार्च

**अकोला :** किर्तन सोहळे यामुळे समाजाची जडणघडण सुदृढ होऊन आदर्श व नीतीमय समाजव्यवस्था निर्माण होत असते. आज समाजात नीती मूल्याचा जो उगम आहे तो अशा महोत्सवाच्या माध्यमातूनच निर्माण झाला आहे. महाराष्ट्र हे अशा नीतिमूल्याचे शक्तिपीठ व कार्यशाळा असून अगदी सनदी अधिकारी सुद्धा महाराष्ट्रात सेवा करण्याची संधी गमावत नाहीत. नीती मूल्यांची जोपासना करणारे असे महोत्सव सातत्याने वाढून भक्तीमार्ग अधिक सुदृढ झाला पाहिजे असे भावोद्गार हभप जगन्नाथ महाराज पाटील यांनी व्यक्त केला.श्री संत जगद्गुरु तुकाराम महाराज बिजोत्सव सेवा समिती, गायत्री नगर कौलखेड च्या वतीने गायत्री नगरच्या प्रांगणात हभप प्रशांत महाराज ताकोते यांच्या मार्गदर्शनात सुरू असलेल्या किर्तन महोत्सवात मुंबई येथील कीर्तनकार हभप जगन्नाथ महाराज पाटील यांनी कीर्तनाचे अंतिम पुष्प सादर केले.ठआता माझ्या भावा, अंतराय नको देवा, आले भागा ते करीतो, तुझे नाम उच्चारितो, दृढ माझे मन, येथे राखावे बांधोन, तुका म्हणे वाटे, नका फुटो देऊ फांटेठया तुकोबांच्या अभंगावर त्यांनी आपले महोत्सवाचे उपांत्य कीर्तन सादर केले. हभप पाटील महाराज यांनी आपल्या कीर्तनात संत श्रेष्ठ तुकोबा भक्तीमध्ये कोणतीही अडचण न आणण्याची विठोबाला याचना करत असल्याचे कीर्तन सादर केले. ते म्हणाले साधुसंत भगवंता जवळ अरीष्टाच्या निर्दालनची अथवा वाईटाच्या निघून जाण्याची, चांगले येण्याची तथा जे जे चांगले आहे ते कायम राहण्याची सातत्याने कामना करीत असतात.


## कृषी उत्पन्न बाजार समिती, मंगरुळपीर जि. वाशिम

### जाहीर सुचना

मंगरुळपीर मुख्य व उपबाजार शेलूबाजार कार्यालयासाठी सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात दिनांक ०१/०४/२०२६ ते ३१/०३/२०२७ या कालावधी करीता खालील कार्यालयीन वापरासाठी असलेल्या कामासाठी पुरवठा दाराकडून बंद लिफाफ्यात पुढील कामाचे दरपत्रक मागविण्यात येत आहे.

१) संगणक देखभाल व दुरूस्ती
२) सी. सी. टी. व्ही. देखभाल व दुरूस्ती
३) ईलेक्ट्रॉनिक्स जनरेटर देखभाल व दुरूस्ती
४) ईलेक्ट्रॉनिक्स वजनकाटे व भुईकाटे ५० टनी २ नग देखभाल व दुरूस्ती
५) ईलेक्ट्रीकल देखभाल व दूरूस्ती

सदर दरपत्रक दिनांक २०/०३/२०२६ रोजी दुपारी १२:३० वाजता उघडून कंत्राट देणे बाबत निर्णय घेण्यात येईल. दिनांक २०/०३/२०२६ रोजी पुरवठादार किंवा प्रतिनिधी हजर राहू शकतात. पुरवठादारांनी त्यांचे दरपत्रके दिनांक १८/०३/२०२६ रोजी ०५ वाजेपर्यंत समितीच्या मुख्य कार्यालयात सादर करावी. दरपत्रकाबाबत सर्व अधिकार समितीस राहील.

**उपाहारगृह (कँटीन) ची खुली हर्रासी**

मंगरूळपीर समितीचे मुख्य व उपबाजार आवारातील उपहारगृहाची खुली हर्रासी दिनांक ०१/०४/२०२६ ते ३१/०३/२०२७ पर्यंत दरमहा भाड्याने द्यावयाची आहे. तरी इच्छुकांनी दिनांक २०/०३/२०२६ रोजी दुपारी ०१:०० वाजता समितीचे मुख्य कार्यालयात हजर राहावे. (सुचना - देखभाल दुरूस्ती, गाळे/गोदाम, उपहारगृह भाड्याने देणे संदर्भात शर्तीअटी समितीच्या कार्यालयात पाहावयास मिळेल.)

**धान्य चाळणी यंत्र खुली हर्रासी**

समितीचे मुख्य मार्केट यार्ड आवारातील प्रतितास १०० टन क्षमतेचे धान्य चाळणी यंत्र दिनांक ०१/०४/२०२६ ते ३१/०३/२०२७ पर्यंत भाड्याने द्यावयाचे आहे. तरी इच्छुकांनी दिनांक २०/०३/२०२६ रोजी ०२ वाजता समितीचे मुख्य कार्यालयात उपस्थित राहावे. हर्रासी देणे किंवा न देणेचे अधिकार समितीस राहतील.

**सभापती/सचिव,
कृषी उत्पन्न बाजार समिती,
मंगरुळपीर जि, वाशिम**

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
शनिवार, दि. १४ मार्च २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

# चाकूने भोसकून युवकाची हत्या, दोन आरोपींना ठोकल्या बेड्या

प्रतिनिधी १४ मार्च

**यवतमाळ** : शहरातील जुना उमरसरा परिसरात चाकुने भोसकुन एका युवकाची निघृण हत्या करण्यात आली. ही घटना दि. 13 मार्च 2026 रोजी रात्री सुमारे 8 वाजताच्या सुमारास घडली. या घटनेने शहरात खळबळ उडाली आहे. अवधूतवाडी पोलिसांनी तीन आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल केला असून, दोन आरोपींना अटक केली.

अमोल संगीत खडसे (वय 25 वर्ष, रा. आंबेडकर नगर, ह.मु सेजल रेसीडन्सी यवतमाळ) असे मृतकाचे नाव आहे. सतीष त्र्यंबकराव गजभीये (वय 38 वर्ष) व कुणाल त्र्यंबकराव गजभीये (वय 44 वर्ष) यांना अटक करण्यात आली आहे. तर गुड्डु उर्फ नितीन गजभीये फरार आहे. या घटनेबाबत फिर्यादी सौ शारदा संगीत खडसे (वय 45 वर्ष, व्यवसाय रोजमजुरी) यांनी पोलीस स्टेशन अवधुलवाडी येथे जबाणी तक्रार नोंदवली. फिर्यादीच्या म्हणण्यानुसार, तिचा मुलगा अमोल दुपारी खर्चासाठी घराबाहेर गेला होता. संध्याकाळी सुमारे 8.00 वाजता अमोलच्या मित्राने तिला फोन करून सांगितले की, अमोलला मारले गेले आहे. घटनास्थळ जुना उमरसरा येथील वडाच्या झाडाजवळ होते. आरोपी सतीष आणि कुणाल गजभीये यांनी अमोलला चाकूने वार केले, तर गुड्डु उर्फ नितीन गजभीये लाथाबुक्क्यांनी मारहाण करत होता. या हल्ल्याआधी अमोल आणि आरोपींमध्ये किरकोळ कारणावरून वाद झाला होता. घटनास्थळी अमोलच्या मित्रांनी साक्षीदार म्हणून पोलीसांना घटनेची माहिती दिली. या घटनेची माहिती मिळताच अवधूतवाडी पोलीस ठाण्याचे अधिकारी, स्थानिक गुन्हे शाखा, उपविभागीय पोलीस अधिकारी यांचे पथकातील अधिकारी व पोलीस कर्मचा-यांनी घटनास्थळ गाठले. अवधूतवाडी पोलीसांनी तपासाचे चक्रे फिरवुन काही तासातच दोन आरोपींना अटक केली. या प्रकरणी अवधूतवाडी पोलिसांनी गुन्हा क्रमांक 336/2026 अंतर्गत कलम 103.3(5) BNS नुसार गुन्हा दाखल केला गेला असून, तपास सुरु आहे.



# क्षुल्लक वादातून सख्ख्या भावाचा खून

प्रतिनिधी १४ मार्च

**उमरखेड** : तालुक्यातील विडूळ येथे घरगुती वादातून सख्ख्या भावांमध्ये झालेल्या हाणामारीत मोठ्या भावाचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी लहान भावाविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करून त्याला अटक केली आहे.



विनोद दत्ता नरवाडे (वय ३४, रा. विडूळ) असे मृतकाचे नाव आहे. तर आरोपी अविनाश दत्ता नरवाडे (वय ३२) असे आरोपीचे नाव आहे. विडूळ ते देवसरी रस्त्यावरील एका अवैध दारू अड्ड्यावर दोन्ही सख्खे भाऊ मद्यधुंद अवस्थेत होते. दरम्यान, क्षुल्लक कारणावरून त्यांच्यात वाद झाला. या वादाचे रुपांतर हाणामारीत झाले. हाणामारीदरम्यान अविनाश नरवाडे याने मोठा भाऊ विनोद नरवाडे यांच्या डोक्यावर लाकडी दांड्याने जोरदार प्रहार केल्याने ते गंभीर जखमी झाले. जखमी अवस्थेत विनोद नरवाडे रक्ताच्या थारोळ्यात पडले होते. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत जखमीला तातडीने उमरखेड येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. प्राथमिक उपचारानंतर प्रकृती गंभीर असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी नांदेड येथे हलविण्यात आले. मात्र गुरुवारी (दि. १२) उपचारादरम्यान त्यांचा नांदेड येथील रुग्णालयात मृत्यू झाला. या घटनेनंतर पोलिसांनी आरोपी अविनाश नरवाडे याच्याविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करून त्याला ताब्यात घेतले आहे. या घटनेमुळे विडूळ परिसरात खळबळ उडाली असून पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक विनायक रामोड करीत आहेत.

# अवैध गॅस साठा उघड; ४० सिलेंडर जप्त, एकावर गुन्हा

प्रतिनिधी १४ मार्च



**पुसद** : शहरातील नूर कॉलनी परिसरात घरातच अवैधरित्या गॅस सिलेंडरचा साठा करून काळ्या बाजारात विक्री करणाऱ्या एका इसमाविरुद्ध कारवाई करण्यात आली. स्थानिक गुन्हे शाखेने टाकलेल्या छाप्यात विविध कंपन्यांचे ४० गॅस सिलेंडर व २३ रेग्युलेटर असा सुमारे २ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी पुसद शहर पोलिस ठाण्यात जीवनावश्यक वस्तू अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

यवतमाळ जिल्ह्यात अवैध धंदे, शस्त्र बाळगणे, तस्करी तसेच जीवनावश्यक वस्तूंची अवैध साठवणूक रोखण्यासाठी पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांनी स्थानिक गुन्हे शाखेला विशेष सूचना दिल्या होत्या. त्यानुसार पोलीस निरीक्षक सतीश चवरे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाला गुप्त माहिती संकलित करून कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले होते. दरम्यान, १३ मार्च रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक पुसद उपविभागात अवैध धंद्यांबाबत माहिती घेत असताना दुपारी सुमारे १२ वाजण्याच्या सुमारास एक महत्त्वाची माहिती मिळाली. नूर कॉलनी, सुभाष वार्ड येथे राहणारा आरिफ मोहम्मद कच्ची हा आपल्या घरात मोठ्या प्रमाणात गॅस सिलेंडर साठवून ते जादा दराने विक्री करीत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली.

या माहितीच्या आधारे स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांना सोबत घेऊन संबंधित ठिकाणी छापा टाकला. घराची तपासणी केली असता भारत, एचपी आणि इंडेन या विविध कंपन्यांचे एकूण ४० गॅस सिलेंडर आणि २३ रेग्युलेटर आढळून आले. पोलिसांनी या बाबत आरिफ मोहम्मद कच्ची याच्याकडे विचारणा केली असता त्याने समाधानकारक उत्तर दिले नाही. त्यामुळे हे सिलेंडर अवैधरित्या साठवून जादा दराने विक्रीसाठी ठेवले असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला. पोलिसांनी तत्काळ कारवाई करत सर्व सिलेंडर आणि रेग्युलेटर असा सुमारे २ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. पुरवठा निरीक्षकांच्या तक्रारीवरून पुसद शहर पोलिस ठाण्यात जीवनावश्यक वस्तू अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात आणि उपविभागीय पोलीस अधिकारी हर्षवर्धन बी. जे. यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. पोलीस निरीक्षक सतीश चवरे यांच्या नेतृत्वात सपोनि धिरज बांडे, पोउपनि शरद लोहकरे, सफौ मुन्ना आडे, संतोष भोरगे, तेजाब रणखांब, सुभाष जाधव, रमेश राठोड, कुणाल मुंडोकार, सुनील पंडागळे, रविंद्र शिरामे, राजेश जाधव यांच्यासह पथकातील इतर कर्मचाऱ्यांनी या कारवाईत सहभाग घेतला. तसेच पुसद तहसील कार्यालयातील पुरवठा निरीक्षक आशिष पवार, अमोल महाजन, संगिता तेर, छाया जामकर, अमित अजमिरे, छाया लोंढे आणि गोदाम व्यवस्थापक सतिश आळणे यांनीही या कारवाईस सहकार्य केले. अवैध गॅस साठवणूक आणि काळाबाजार रोखण्यासाठी पोलिसांकडून पुढेही अशीच कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

# भोगवटदार जमिनीच्या रुपांतरणासाठी ५० हजारांची लाच; महसूल विभागातील दोघे एसीबीच्या जाळ्यात

प्रतिनिधी १४ मार्च

**यवतमाळ** : भोगवटदार वर्ग–२ ची जमीन वर्ग–१ मध्ये रूपांतरित करण्याच्या कामासाठी ५० हजार रुपयांची लाच स्वीकारताना जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल सहाय्यक आणि वरिष्ठ लिपिकाला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ पकडले. शुक्रवारी सायंकाळी स्टेट बँक चौक परिसरातील एका बारमध्ये ही कारवाई करण्यात आली.



या प्रकरणात गोपाल महादेवराव मोहाडे (महसूल सहाय्यक, महसूल विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ) आणि राहुल अरुणराव कुण्टे (वरिष्ठ लिपिक, प्रतिनियुक्ती तहसील कार्यालय, पांढरकवडा) अशी आरोपींची नावे आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, कळंब तालुक्यातील एका शेतजमिनीचे भोगवटदार वर्ग-२ मधून भोगवटदार वर्ग–१ मध्ये रूपांतर करण्यासाठी संबंधित शेतकऱ्याने शासनाचा नजराणा भरला होता. मात्र संबंधित आदेश काढण्यासाठी आरोपींनी सुरुवातीला ७५ हजार रुपयांची लाच मागितल्याचा आरोप आहे. पुढील चर्चेनंतर ही रक्कम ५० हजार रुपयांवर ठरविण्यात आली होती.

दरम्यान, तक्रारदाराने या प्रकरणाची माहिती लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, यवतमाळ येथे दिली. त्यानंतर विभागाने पडताळणी करून सापळा रचण्याचा निर्णय घेतला. ठरल्याप्रमाणे शुक्रवारी सायंकाळी सुमारे ४ ते ४.३० वाजताच्या सुमारास स्टेट बँक चौक परिसरातील एका बारमध्ये लाचेची रक्कम देण्याचे निश्चित करण्यात आले होते.त्यानुसार लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस उपअधीक्षक अभय आष्टेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अर्जुन घनवट व त्यांच्या पथकाने संबंधित ठिकाणी सापळा रचला. यावेळी तक्रारदाराकडून ५० हजार रुपये स्वीकारताना गोपाल मोहाडे आणि राहुल कुण्टे यांना पथकाने रंगेहात पकडले. या कारवाईमुळे जिल्हाधिकारी कार्यालय व महसूल विभागात एकच खळबळ उडाली आहे.ही कारवाई अमरावती परिक्षेत्राचे अ‍ॅन्टी करप्शन ब्युरोचे पोलीस अधीक्षक बापू बांगर व अपर पोलीस अधीक्षक सतींद्र शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पोलीस उपअधीक्षक अभय आष्टेकर, पोलीस निरीक्षक अर्जुन घनवट यांच्यासह पोलीस हवालदार जयंत ब्राम्हणकर, अब्दुल बसीम, संजय भुजाडे, सचिन भोयर, ईफराक्ष काझी, भागवत पाटील, आकाश सहारे, महिला पोलीस कॉन्स्टेबल मनीषा राजुरकर तसेच पोलीस कॉन्स्टेबल अतुल नागमोते यांच्या पथकाने ही कारवाई केली. पुढील तपास पोलीस उपअधीक्षक अभय आष्टेकर करीत आहेत.

# युद्धामुळे गॅसचा धसका; भीतीमुळे नागरिक रांगेत उभे

प्रतिनिधी १४ मार्च

**आर्णी** : देशातील युद्धजन्य परिस्थितीमुळे सध्या सर्वत्र भीतीचे वातावरण आहे. या काळात स्वयंपाक गॅसचा तुटवडा झाल्याच्या अफवांनी नागरिकांमध्ये गैरसमज निर्माण केला आहे. यामुळे शहरभर लोक सिलेंडरसाठी धावपळ करत आहेत.



गरजपेक्षा जास्त सिलेंडर साठवण्याच्या मानसिकतेमुळे अनेकांना प्रत्यक्ष गरज असतानाही सिलेंडर मिळत नसल्याचे चित्र दिसून येत आहे. तथापि, प्रशासनाने स्पष्ट केले आहे की जिल्ह्यातील गॅसचा साठा पुरेसा उपलब्ध आहे आणि नागरिकांनी अनावश्यक गर्दी टाळावी. अद्यापही काही ठिकाणी गॅस एजन्सी समोर नागरिकांची लांबच लांब रांगा दिसून येत आहेत, ज्यामुळे प्रशासनकडून जागरूकता मोहीम सुरू करण्यात आली आहे.

# पाकीट चोरी; आरोपीला घेतले ताब्यात

प्रतिनिधी १४ मार्च

**आर्णी** : आर्णी येथील बस स्टेंडवर पॅन्टच्या खिशातील पाकीट चोरीला गेले होते. मात्र, स्थानिक पोलीसांनी अज्ञात आरोपीचा शोध घेऊन गुन्ह्याचा उलगडा अवघ्या २४ तासात केला. आरोपीस ताब्यात घेतल्यानंतर, चोरी गेलेला मुददेमाल देखील जप्त करण्यात आला.

सैयद लादीन सैयद मईनोद्दीन (वय ३०, रा. मोतीनगर, दिग्रस) असे आरोपीचे नाव आहे. १२ मार्च २०२६ रोजी फिर्यादी गणेश प्रताप लोकडे (वय २९, रा. जवळा, ता. मेहकर, जि. बुलढाणा) आर्णी येथे कामानिमित्त आले होते. सायंकाळी आर्णी बस स्टेंडवर दिग्रस बसमध्ये चढत असताना, अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या पॅन्टच्या खिशातील पाकीट चोरी केले. या पाकिटात ९,७०० रुपये रोख रक्कम आणि महत्वाचे ओळखपत्रे होती. पोलीस स्टेशन आर्णी येथे फिर्यादीने तक्रार दाखल केली असून, अज्ञात आरोपीविरूद्ध गुन्हा नोंदवला गेला. पोलीसांनी तांत्रिक विश्लेषणावर आधारित आरोपीचा शोध सुरू केला आणि १३ मार्च २०२६ रोजी आरोपी सैयद लादीन सैयद मईनोद्दीन (वय ३०, रा. मोतीनगर, दिग्रस) याला ताब्यात घेतले. आरोपीने गुन्ह्याची कबुली दिली, त्यावरून चोरी गेलेली रोख रक्कम २,५०० रुपये आणि फिर्यादीचे महत्वाचे ओळखपत्रे जप्त केली. पोलीसांच्या कठोर तपासामुळे २४ तासाच्या आत गून्ह्याचा उलगडा करण्यात यश मिळालं. ही कारवाई पोलीस अधिक्षक यवतमाळ, अपर पोलीस अधिक्षक यवतमाळ, उपविभागीय पोलीस अधिकारी दारव्हा यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस निरीक्षक निलेश सुरडकर, पोलीस हवालदार गुणवंता बोईनवाड, नितीन वास्टर, आकाश गावंडे, आशिफ खल्लीखाउ यांनी केली.

# शिक्षक साहेबराव राठोड यांचा सन्मान

प्रतिनिधी १४ मार्च

**पुसद** : गुरु हा समाजातील अत्यंत आदरणीय व्यक्ती मानला जातो, पण त्यासाठी निष्ठा आणि सातत्य आवश्यक असते. वडसद तांडा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील माजी शिक्षक साहेबराव राठोड यांनी सातत्यपूर्ण कार्य केले आणि गावकऱ्यांनी त्यांचा "उत्कृष्ट शिक्षक सन्मान" कार्यक्रम आयोजित करून त्यांना जाहीर गौरव दिला.




वार्षिक स्नेहसंमेलनाच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष भोलानाथ कांबळे (माजी जिल्हा परिषद सदस्य) होते . तर उद्घाटक म्हणून धीरज आडे (गटशिक्षण अधिकारी, पुसद) उपस्थित होते. प्रमुख अतिथी सुनील गवळी (विस्तार अधिकारी), सोनबा ढोकणे (केंद्रप्रमुख), गावच्या सरपंच सुषमा राठोड, शाळा स्थापन समितीचे अध्यक्ष मनोहर जाधव, तसेच बळीराम जाधव, राजेश राठोड, रमेश राठोड, मंगल चव्हाण, संतोष राठोड, विशाल राठोड उपस्थित होते.

अध्यक्ष भोलानाथ कांबळे यांनी म्हटले की, राठोड यांच्या कार्याची ही पावती आहे. त्यांच्या सारखे शिक्षक समाजासाठी प्रेरणादायी ठरतात." तर धीरज आडे यांनी सांगितले की, "गाव आणि शाळा एकत्र आल्यास बदल निश्चित होतो. राठोड यांनी हे कार्य उत्कृष्टपणे केले."

साहेबराव राठोड यांनी शाळेत सात वर्षे कर्तव्य बजावताना मुख्याध्यापक शशिकांत जामगडे यांच्या मार्गदर्शनात विविध गुणवत्ता सुधारणा उपक्रम राबवले. यात व्हिलेज गोटू स्कूल, छतावरची शाळा, माता हेच गुरु, आदर्श परिपाठ, आजचा माझा, स्वच्छ सुंदर विद्यार्थी, आदर्श विद्यार्थी, कृती युक्त पाढे, माझे हस्ताक्षर माझे भविष्य, बोलीभाषेकडून मातृभाषेकडे, भव्य दिव्य सांस्कृतिक कार्यक्रम यांचा समावेश होता.

गावकऱ्यांच्या सहकार्याने शाळा सुसज्ज करण्यासाठी विविध भौतिक सुविधा उपलब्ध करून दिल्या. त्यासाठी गावातील नागरिक, पालक, नवतरुण वर्ग आणि शिक्षक यांनी संपूर्ण सहभाग घेतला. श्री. राठोड यांना शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह आणि सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.

सत्राचे सूत्रसंचालन सरस्वती भुरके यांनी केले तर आभार उज्वलराज सुनकुरवार यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशासाठी गावकऱ्यांनी, माजी विद्यार्थ्यांनी, शिक्षकांनी आणि नवयुवक मंडळाने सक्रिय सहभाग घेतला.

# पुसद येथे आदिवासी महिला मेळावा

प्रतिनिधी १४ मार्च

**यवतमाळ** : एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पुसद अंर्तगत स्वातंत्र्यवीर बाबूराव शेडमाके यांच्या जयंतीचे औचित साधुन जिजामाता मंगल कार्यालय, पुसद येथे आदिवासी महिला मेळावा व विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून नगराध्यक्षा मोहिनीताई इंद्रनील नाईक, माजी जिल्हा परिषद अध्यक्षा डॉ. आरतीताई फुफाटे तसेच प्रकल्प अधिकारी अमोल मेतकर उपस्थित होते.

सर्व पथम स्वातंत्र्यवीर बाबूराव शेडमाके, वीर बिरसा मुंडा व यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेचे पूजन व माल्यार्पण करून दीपप्रज्वलनाने करण्यात आली.

शासकीय आश्रमशाळा पुसद व वडगाव शिंदे येथील विद्यार्थिनींनी सादर मनमोहक आदिवासी नृत्याने उपस्थितांची मने जिंकली. विद्यार्थ्यांनी शिक्षण घेऊन प्रगती साधावी, असे आवाहन मोहिनीताई नाईक यांनी यावेळी काढले.

या कार्यक्रमाच्या वेळी राणी दुर्गावती आदिवासी महिला सक्षमीकरण योजना तसेच केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजनेंतर्गत लाभार्थी महिला बचत गटांना धनादेशांचे वाटप करण्यात आले.

# मोरचंडी खचकड परिवाराने रूढी तोडून साजरा केला नव्या पद्धतीचा विवाह पायंडा

प्रतिनिधी १४ मार्च

**उमरखेड** : महाराष्ट्रातील विवाह पद्धतीत विविध जातीत विविध प्रथा पाळल्या जातात. अशातच उमरखेड तालुक्यातील बंजारा समाजाने विवाहातील परंपरागत रुढीमध्ये बदल करून नवीन पद्धत रूढ केली आहे.

मोरचंडी येथील खचकड परिवाराने मुलाच्या विवाह स्वागत समारंभाचे आयोजन आर्थिक परिस्थिती चांगली असतानाही आपल्या गावातील लोकांसोबत साजरे केले. संपूर्ण गावाला चुलबंद जेवण दिले आणि गावकऱ्यांना सोहळा अनुभवता यावा यासाठी शहरातील कार्यक्रम रद्द करून हा सोहळा गावात आयोजित केला.



बंजारा समाजात पारंपरिक हुंडा पद्धत असूनही, वधूपित्याला विवाहासाठी लागणारा खर्च भागवण्यासाठी पाहुणे रोख रक्कम देतात, त्यामुळे विवाहातील खर्चाचा मुख्य भाग समाजातील बांधव उचलतात. या नव्या पद्धतीमुळे वधूपित्याला आनंद मिळतो आणि सामाजिक एकात्मता टिकते.

खचकड परिवाराने मुलगा (नाव नोंद नाही) आणि मुलगी (नाव नोंद नाही) दोघेही डॉक्टर घडवले असून, त्यांनी आपल्या गावातील लोकांसोबत हा कार्यक्रम साजरा करून प्रगतीशील विचार दाखवला.


सेवानिवृत्त शिक्षक रावसिंग खचकड यांनीही या कार्यक्रमाचे आयोजन आणि मार्गदर्शन केले. गावकऱ्यांनीही या प्रामाणिक पुढाकाराचे मोठ्या प्रमाणात स्वागत केले.

# नगरपरिषद, नगरपंचायतींना 42 कोटींचा निधी मंजूर

## पालकमंत्री ना. संजय राठोड यांच्या पाठपुराव्याला यश

प्रतिनिधी १४ मार्च

**यवतमाळ** : केंद्र शासनाच्या "भांडवली गुंतवणुकीसाठी राज्यांना विशेष सहाय्य या योजनेअंतर्गत महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानंतर्गत ४४ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पाणीपुरवठा, मल:निस्सारण आणि रस्ते विकास प्रकल्पांसाठी राज्याच्या हिस्स्यातील ३६० कोटी रुपयांचा निधी वितरित करण्याचा शासन निर्णय जारी करण्यात आला आहे. यात यवतमाळ जिल्ह्यातील दिग्रस, उमरखेड, यवतमाळ, पांढरकवडा या नगरपरिषदांचा आणि ढाणकी नगरपंचायतीचा समावेश आहे.



उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री ना. एकनाथ शिंदे यांच्या निर्देशानुसार नगर विकास विभागाने १० मार्च २०२६ रोजी काढलेल्या शासन निर्णयानुसार नगरोत्थान महाभियानांतर्गत प्रगतीपथावर असलेल्या ४४ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांतील पाणीपुरवठा, मल:निस्सारण व रस्ते विकास प्रकल्पांसाठी एकूण ३६०.२६३ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

हा निधी केंद्र शासनाकडून ५० वर्षांच्या बिनव्याजी कर्जाच्या स्वरूपात राज्यांना उपलब्ध करून देण्यात येत असून संबंधित नगर संस्थांच्या मंजूर प्रकल्पांसाठी वापरण्यात येणार आहे. यात राज्य शासनाचा हिस्सा उपलब्ध करण्यात आला आहे.

या निर्णयानुसार यवतमाळ जिल्ह्यातील चार नगरपरिषद व एक नगरपंचायतीच्या पाणीपुरवठा व मल:निस्सारण प्रकल्पांसाठी ४२ कोटींचा निधी मंजूर करण्यात आला आहे. त्यात उमरखेड नगरपरिषदेच्या पाणीपुरवठा प्रकल्पासाठी सुमारे १२ कोटी रुपये, ढाणकी नगरपंचायतीच्या पाणीपुरवठा प्रकल्पासाठी ७ कोटी रुपये, दिग्रस नगरपरिषदेच्या पाणीपुरवठा प्रकल्पासाठी ५ कोटी रुपये, यवतमाळ नगरपरिषदेच्या मल:निस्सारण प्रकल्पासाठी १० कोटी रुपये, पांढरकवडा नगरपरिषदेच्या पाणीपुरवठा प्रकल्पासाठी ८ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. यासाठी पालकमंत्री ना. संजय राठोड यांनी शासनस्तरावर सातत्याने पाठपुरावा केला होता त्याला यश आले असून यवतमाळ जिल्ह्याला भरीव निधी उपलब्ध करुन दिल्याबद्दल त्यांनी उपमुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे यांचे आभार मानले.

### नागरी सुविधांच्या प्रकल्पांना चालना

- नगरोत्थान महाभियानांतर्गत पूर्वी मान्यता दिलेल्या पायाभूत प्रकल्पांच्या राज्य हिस्सा निधी म्हणून हे विशेष अनुदान वापरले जाणार आहे. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार आणि राज्याच्या नगरोत्थान महाअभियानाच्या कार्यपद्धतीनुसार खर्च करणे बंधनकारक राहणार आहे. या निधीमुळे नागरी स्थानिक संस्थांच्या पाणीपुरवठा, मल:निस्सारण तसेच रस्ते विकास प्रकल्पांना चालना मिळणार आहे.

५
सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
शनिवार दि. १४ मार्च २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## गॅसचा काळाबाजार रोखण्यासाठी यंत्रणा 'ॲक्शन मोडवर'

जागतिक स्तरावर निर्माण होत असलेल्या युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर घरगुती एलपीजी गॅसचा पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी तसेच गॅसचा अवैध वापर व काळाबाजार रोखण्यासाठी जिल्हा प्रशासनाने उपाययोजना करण्याचे निर्देश दिले आहेत. केंद्र व राज्य शासनाचे आदेश, नियम आणि मार्गदर्शक तत्वांच्या अनुषंगाने घरगुती एलपीजी गॅसचा अवैध वापर रोखण्यासाठी गॅस एजन्सींच्या तपासण्या करण्याबाबत दक्षता पथक किंवा फिरते पथक स्थापन करण्याच्या शासनाकडून सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार जिल्ह्यातील तहसीलदार, नगर परिषद मुख्याधिकारी, गटविकास अधिकारी, पोलीस निरीक्षक, पुरवठा निरीक्षक, पुरवठा निरिक्षण अधिकारी, वितरण कंपन्यांचे सेल्स ऑफिसर अशा संबंधित अधिकाऱ्यांनी आपल्या कार्यक्षेत्रात नियमित तपासण्या कराव्यात, असे निर्देश प्रभारी जिल्हाधिकारी ब्रिजेश पाटील यांनी दिले आहेत. घरगुती एलपीजी गॅस सिलिंडर तसेच व्यावसायिक गॅस सिलिंडरचा पुरवठा सुरळीत राहील, याची विशेष दक्षता घ्यावी. तसेच घरगुती गॅसचा व्यावसायिक किंवा अन्य अवैध वापर होत असल्यास त्यावर तात्काळ कारवाई करावी, असेही जिल्हाधिकाऱ्यांनी आवाहन केले आहे.




# जिल्ह्यातील शिक्षकांचे होतयं मरण...

# एकीकडे राजकारण, दुसरीकडे अधिकाऱ्यांचे भ्रष्टधोरण !

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

**वाशीम जिल्ह्यातील माध्यमिक शिक्षण विभागातील खुलेआम सुरू असलेला भ्रष्टाचार एका शिक्षकाच्या व्हीडीओमुळे सोशल मिडीयाच्या माध्यमातून चव्हाट्यावर आला आहे. त्या शिक्षकाला न्याय देण्यासाठी अमरावती विभागाच्या शिक्षक नेत्या डॉ. संगीता शिंदे यांनी पुढाकार घेतल्याने 'या' प्रकरणात एका बाजूने राजकारण सुरू असल्याचा आरोप केल्या जात आहे. तर दुसरीकडे शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांचा खुलेआम भ्रष्टाचार सुरू असल्याची गंभीर बाब निदर्शनास आली आहे. आता या 'श्रेयवादाच्या' प्रकरणात शालार्थ आयडी मिळण्यासाठी मागील चार महिन्यापासून शिफारस पत्रासाठी वाट पाहणाऱ्या भारत टोंचर या शिक्षकाला न्याय मिळणार का ? याकडे जाणकारांचे लक्ष लागले आहे.**

* जिल्ह्यासह विभागातील शिक्षण विभाग भ्रष्टाचाराने बरबटलेला
* जिल्ह्यातील शिक्षक आमदार आणि शिक्षक संघटनांचे 'मौनव्रत'
* त्रस्त शिक्षकाची विभागीय शिक्षकनेत्याकडे धाव






**शिक्षक नेत्या डॉ.सौ.संगीता शिंदे (बोंडे) यांनी त्यांच्या फेसबुकवर शिक्षणाधिकाऱ्यांनी ५० हजाराची लाच मांगितल्याचा व्हिडीओ व्हायरल केला व शिक्षणाधिकाऱ्यांना धारेवर धरले. यावरून शिक्षण विभागात दाम दिल्याशिवाय काम होत नसल्याचे सिध्द झाले आहे.**




वाशीम जिल्ह्यात शिक्षकांच्या अनेक संघटना आहेत. सोबतच अमरावती विभागाचे शिक्षक आमदार किरणराव सरनाईक हे सुद्धा वाशीमचेच आहेत. तसेच शिक्षक आमदार संस्थानिक असल्यामुळे आणि त्यांना पुन्हा शिक्षक आमदार होण्याची सुप्त ईच्छा असल्यामुळे त्यांनी वाशीम जिल्ह्यातील शिक्षकांसह शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी पुढाकार घेण्याची गरज होती. तसेच शिक्षक आमदारांचा शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांवर 'वचक' ही आवश्यक असतांना वाशीम जिल्ह्यातील माध्यमिक शिक्षण विभागातील कार्यरत अधिकारी प्रत्येक कामासाठी शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांकडून त्यांना आवश्यक असलेली रक्कम घेतल्याशिवाय कोणतेही काम होत नसल्याची अनेक प्रकरणे चर्चेत आहेत. शिक्षक संघटना आणि शिक्षक आमदारांच्या मौनव्रतामुळे भ्रष्ट अधिकाऱ्यांनी खुलेआम भ्रष्टाचार सुरू केल्याचा आरोप विविध स्तरातून आरोप केल्या जात आहे. वाशीम तालुक्यातील उकळीपेन येथील विनाअनुदानित असलेल्या विद्याप्रबोधिनी कनिष्ठ महाविद्यालयातील उच्च माध्यमिक शिक्षक भारत मारोती टोंचर या शिक्षकाला वेतन मिळण्यासाठी शालार्थ आयडीची आवश्यक्ता आहे. भारत टोंचर यांनी त्यांना शालार्थ आयडी मिळण्यासाठी माध्यमिक शिक्षणाधिकारी यांचे शिफारस पत्र मिळण्यासाठी ऑक्टोबर २०२५ मध्ये माध्यमिक शिक्षणाधिकारी यांचेकडे प्रस्ताव दाखल केला आहे. १३ मार्च २०२६ पर्यंत भारत टोंचर यांना शालार्थ आयडी प्राप्त झाला नसल्याची बाब त्यांनी सोशल मिडीयावर व्हीडीओ टाकून जगजाहिर केली आहे. हा व्हीडीओ टाकण्यापुर्वी भारत टोंचर यांनी माध्यमिक शिक्षणाधिकारी यांची प्रत्यक्ष भेट घेवून शालार्थ आयडी साठी शिफारस पत्राची मागणी केली. परंतु टोंचर यांना कार्यरत माध्यमिक शिक्षणाधिकारी मंगला धुपे यांनी एका कागदावर ५० हजाराचा आकडा लिहून टोंचर यांना खुलेआम ५० हजाराच्या लाचेची मागणी केली असल्याचा प्रकारही सोशल मिडीयावर टाकलेल्या व्हीडीओमुळे उघडकीस आली आहे. भारत टोंचर यांनी जिल्ह्यातील शिक्षक संघटनांना याबाबत माहिती दिली. परंतु जिल्ह्यातील शिक्षक संघटनांनी त्यांना न्याय न दिल्याने टोंचर यांनी थेट अमरावती विभागाच्या शिक्षक नेत्या डॉ.संगीता शिंदे यांचेकडे धाव घेवून न्यायाची मागणी केली. शिक्षक नेत्या असलेल्या डॉ.संगीता शिंदे यांनी घटनेचे गांभीर्य पाहून वाशीमच्या माध्यमिक शिक्षणाधिकारी मंगला धुपे यांना फोन करून त्यांची कानउघाडणी करून त्यांना धारेवर धरल्याचा व्हीडीओसुद्धा सोशल मिडीयावर व्हायरल झाल्यामुळे त्यांच्या प्रतिस्पर्धी शिक्षक संघटनाकडून टोंचर यांच्या प्रकरणात राजकारण सुरू असल्याचा आरोप केल्या जात आहे. अमरावती विभागीय शिक्षक आमदाराची निवडणूक यावर्षी नोव्हेंबर, डिसेंबर महिन्यात होणार आहे. ही निवडणूक केव्हाही होवू द्या, परंतु भारत टोंचर यांना न्याय मिळण्यासाठी अमरावती विभागाच्या शिक्षक नेत्या डॉ.संगीता शिंदे यांनी पुढाकार घेवून 'भ्रष्ट' महिला अधिकाऱ्यास धारेवर धरून कानउघाडणी केल्याबद्दल त्यांचे त्रस्त शिक्षकांकडून कौतुक केल्या जात आहे. आता शालार्थ आयडी मिळण्यासाठी मागील चार महिन्यापासून वाट पाहणाऱ्या भारत टोंचर यांना न्याय मिळतो का ? पुन्हा त्यांना भ्रष्ट महिला

अधिकाऱ्याला लाच देण्याची वेळ येईल का ? याकडे जाणकारांचे लक्ष लागलेले आहे.

## थोडक्यात

### यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात पदवी वितरण समारंभ




● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●

येथील यशवंतराव चव्हाण कला व विज्ञान महाविद्यालय, मंगरूळपीर येथे पदवी वितरण समारंभ उत्साहात पार पडला. समारंभाच्या अध्यक्षस्थानी श्री मोतीरामजी ठाकरे शिक्षण प्रसारक मंडळ, कासोला यांचे कोषाध्यक्ष मा. दिलीप ठाकरे होते. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते म्हणून सुभद्राबाई पाटील महाविद्यालय, मानोरा येथील प्राचार्य डॉ. नंदकिशोर ठाकरे उपस्थित होते. तसेच यशवंतराव चव्हाण कला व विज्ञान महाविद्यालय, मंगरूळपीरचे प्राचार्य डॉ. राहुल सुर्वे हेही मंचावर उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन डॉ. प्रमोद देवके यांनी केले. या पदवी वितरण समारंभात विज्ञान विभागातील ६० तर कला विभागातील ४५ विद्यार्थ्यांना मंचावर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पदवी प्रदान करण्यात आली. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य यांच्या मार्गदर्शनाखाली कला विभागाचे पर्यवेक्षक डॉ. शरद वाघोले व विज्ञान विभागाचे पर्यवेक्षक डॉ. संजीव इंगळे यांनी विशेष परिश्रम घेतले.

### श्रीनाथ योगाश्रमात नवनाथ ग्रंथ पारायण व महायज्ञाचे आयोजन

● सिटी न्युज ब्युरो @ कारंजा ●

श्रीनाथ योगाश्रम रामगांव रामेश्वर येथे दरवर्षी प्रमाने याही वर्षी श्री गुरुचरण पादुका व श्री काशीविश्वेश्वर शिवलिंगाच्या प्राणप्रतिष्ठेच्या वर्धापन दिना निमित्त श्री. नवनाथ ग्रंथ पारायण व महायज्ञाचे १४ मार्च ते १६ मार्च २०२६ पर्यंत आयोजन करण्यात आले आहे. पारायणाचार्य ह.भ.प महेशनाथजी महाराज रामगाव यांचे वाणीतून होणार आहे. १४ मार्च शनिवार ते १६ मार्च २०२६ सोमवार या दरम्यान संस्थानच्या वतीने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. १४ मार्च ला श्री. काशी विश्वेश्वर शिवलींग अभिषेक, श्री सिध्द सदगुरु गोरक्षनाथ महाराज समाधी अभिषेक, पुजा, आरती, श्री जितेंद्र पाठक गुरुजी व त्याचे सहकारी ब्रम्हवृंद यांच्या हस्ते समाधी अभिषेक, श्री.ह.भ.प. मंगलनाथजी महाराज श्रीनाथ योगाश्रम भेडाघाट (मध्यप्रदेश) यांचे प्रवचन, श्री.निवृत्ती राघोजी सुर्वे लाठी यांच्या तर्फे महाप्रसाद, श्री संत भिकमपुरी महाराज हरिपाठ मंडळ रामगांव यांचा हरिपाठाचा कार्यक्रम, संध्याकाळी लक्ष्मण ज्ञानदेव येवले तपोवन यांच्या तर्फे महाप्रसाद नंतर बाल किर्तनकार ह.भ.प.संस्कार महाराज लोडम यांचे हरी किर्तन होईल. १५ मार्च रविवारला श्री काशी विश्वेश्वर शिवलींग अभिषेक, श्री सिध्द सदगुरु गोरक्षनाथ महाराज समाधी अभिषेक, पुजा, आरती, श्री.ह.भ.प.संतोषनाथ महाराज पंढरपूर यांचे प्रवचन, एकादशी फराळ रामनाथ किसनराव महल्ले रा.लोहगांव ह मु.दिघी यांच्या वतीने, श्री संत भिकमपुटी महाराज हरिपाठ मंडळ रामगांव यांचा हरिपाठाचा कार्यक्रम होणार आहे.



## निर्धारित उद्दिष्टे वेळेत पूर्ण करा, समन्वय राखा - प्र.जिल्हाधिकारी

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

निती आयोगाने निश्चित केलेले इंडिकेटर हे जिल्ह्याच्या विकासाचे महत्त्वाचे मोजमाप असून सर्व क्षेत्रांत संतुलित व शाश्वत प्रगती साधण्यासाठी प्रत्येक विभागाने निर्देशांकांवर लक्ष केंद्रित करून नियोजनबद्ध काम करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन प्रभारी जिल्हाधिकारी ब्रिजेश पाटील यांनी केले.

यावेळी ते बोलत होते. यावेळी जिल्हा नियोजन अधिकारी राजेश सोनखासकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी आत्माराम बोंद्रे, महिला व बालकल्याण अधिकारी संजय गणवीर, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. पी. एस. ठोंबरे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी आरीफ शाहा, सहायक जिल्हा नियोजन अधिकारी संजय राठोड, कौशल्य विकास विभागाचे सहायक आयुक्त प्रविण खंडारे, उपशिक्षणाधिकारी गजानन डाबेराव, मुख्यमंत्री फेलो संकेत नरुटे आदी उपस्थित होते. प्रत्येक विभागाने आपल्या जबाबदारीतील इंडिकेटरचा नियमित आढावा घेऊन आवश्यक त्या सुधारात्मक उपाययोजना कराव्यात, असे त्यांनी सांगितले.



## वाशीम रेल्वे स्टेशनवर प्रवाशांची मरमर...

# लघवीसाठीही दर, पार्कींगमध्ये दादागिरीची भर !



● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

**सिटी न्युज सुपरफास्टचा सततचा पाठपुरावा...**

**७ ते ८ वर्षापासून कारण नसतांना पार्कींगचे पैसे देवूनही विनाकारण महिलांसमोर अश्लिल शिवीगाळ करून दादागिरी करणाऱ्या मग्रुर ठेकेदाराला वाशीमचे नागरिक त्रस्त झाले होते. या संबंधिचे सर्वप्रथम सिटी न्युज सुपरफास्टने व आरआरसी न्युजने वृत्त प्रकाशित करून जनतेच्या भावनेला वाचा फोडली. या प्रकरणाची १६ वृत्ताची वृत्त मालिका लावून धरली. त्यामुळे १५ दिवसापासून दररोज हजारो फोन सिटी न्युज सुपरफास्टला येत असून धन्यवाद देत आहेत.**




वाशिम रेल्वे स्थानकावरील पार्कींगमध्ये पैसे देवूनही विनाकारण दादागिरीकरून प्रवाशाला त्रास देण्याचा प्रकार उघडकिस आला होता. या प्रकाराची सिटी न्युज सुपरफास्टने वृत्त मालिका लावून धरली. त्यानंतर मुजोर ठेकेदाराने माफी मांगितली. आता प्रवाशांकडून शौचालय वापरासाठी लघवीसाठीही पैसे आकारले जात असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला असून यामुळे प्रवाशांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. त्यामुळे याकडे लक्ष देण्याची गरज आहे.

रिसोड येथील रहिवासी विजय लक्ष्मण जुंजारे यांनी या प्रकाराविरोधात अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. तक्रारीनुसार, १४ फेब्रुवारी रोजी कुटुंबासह कोल्हापूरला जाण्यासाठी आलेल्या जुंजारे यांना ट्रेन उशिरा असल्यामुळे रेल्वे स्थानकावर थांबावे लागले. यावेळी त्यांच्या पत्नी व मुलीला लघवीसाठी शौचालय वापरायचे असताना तेथील ठेकेदाराने लघवीसाठीही प्रत्येकी ५ रुपये देण्याची सक्ती केली, असा गंभीर आरोप करण्यात आला आहे. संडासासाठी शुल्क आकारणे काही प्रमाणात ग्राह्य धरले जाऊ शकते; मात्र लघवीसारख्या मूलभूत गरजेसाठीही पैसे उकळणे म्हणजे प्रवाशांची सरळसरळ लूट असल्याची तीव्र प्रतिक्रिया जुंजारे यांनी व्यक्त केली. या प्रकारामुळे महिला, विद्यार्थी व ज्येष्ठ नागरिकांना मानसिक त्रास सहन करावा लागत असल्याचेही त्यांनी नमूद केले. या प्रकरणाची गंभीर दखल घेत केंद्रीय रेल्वे प्रवासी सल्लागार समितीचे सदस्य सुरज चौधरी यांच्याकडे लेखी तक्रार करण्यात आली असून संबंधित ठेकेदाराकडून माफीनामा घेऊन कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच महिलांसाठी सुरक्षित, स्वच्छ व मोफत लघवीची सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणीही जोर धरत आहे. पार्कींगच्या दादागिरीच्या विरोधात नागरिकांनी एकजुट दाखवित तक्रारी केल्या. त्यानंतर आता इतरही समस्यांकडे प्रशासनाने लक्ष द्यावे. दरम्यान, या तक्रारीची प्रत रेल्वे मंत्री, मुख्यमंत्री, जिल्हाधिकारी वाशिम तसेच पालकमंत्र्यांनाही पाठविण्यात आली असून प्रशासनावर कारवाईचा दबाव वाढला आहे. प्रवाशांच्या मूलभूत गरजांवरच 'दर' लावण्याच्या या प्रकारामुळे रेल्वे प्रशासनाची संवेदनशीलता प्रश्नचिन्हाखाली आली असून आता दोषींवर नेमकी काय कारवाई होते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# चौकशी अधिकारी चतूर, दोषींवर कारवाई थातूर-मातूर!

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

जिल्ह्यात खळबळ उडवून देणाऱ्या शेलुखडसे येथील पोकरा घोटाळ्याने कृषी विभागाची लक्तरे वेशीवर टांगल्या गेली आहेत. थेट मुख्यमंत्र्यापर्यंत सदर घोटाळ्याची तक्रार पोहचल्यानंतर जिल्ह्यातील माध्यमांनी हे प्रकरण उचलून धरले होते. याची दखल घेत विभागीय कृषी सहसंचालक अमरावती यांनी चौकशीचे आदेश दिले होते.

त्यानुसार तपास अधिकारी अनिल राठोड यांनी प्राथमिक तपासणी करून अहवाल सादर केला होता. सदर अहवालावर जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांनी शिफारस करून प्रकरण कृषी सहसंचालक अमरावती यांच्याकडे पाठविण्यात आले होते. घोटाळ्याचे गांभीर्य ओळखून विभागीय कृषी सहसंचालक अमरावती यांनी दोषींवर कारवाई करण्याचे आदेश सुद्धा दिले आहेत. मात्र जिल्हापातळीवरील अधिकारी चतुर आणि कारवाई थातुरमातुर असे वास्तव समोर येत असल्याने हे प्रकरण दडपण्याचा प्रयत्न केला जात असल्याची चर्चा जिल्हाभर होत आहे. परिणामी भ्रष्टाचारी थाट अन् योजनेची लावली वाट असे अपरोधाने जिल्हावासी बोलत आहेत.. जिल्ह्यातील पोकरा घोटाळ्याने कृषी विभागाची झोप उडाली आहे. रिसोड तालुक्यातील पोकरा गैरप्रकरणाने तर, कृषी विभागाच्या कार्यप्रणालीवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. क्षेत्रीय पातळीवरील काही कमिशनखोर अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी दलालांना हाताशी धरून शेतकऱ्यांच्या हक्कावरच घाव घातला असल्याचे निष्पन्न होत आहे. ग्राम पातळीवरील कृषी सहाय्यकांपासून ते थेट जिल्हा कृषी कार्यालयापर्यंत या घोटाळ्याचे धागेदोरे असल्याचा संशय आता व्यक्त केला जात आहे. बोगस फळबाग लागवड प्रकरणी विभागीय कृषी सहसंचालकांनी बोगस अनुदान वसुली करण्यासंदर्भात कार्यवाहीचे आदेश दिले आहेत. मात्र यावर







**वाशिम मध्ये सुद्धा, जालना पॅटर्न राबविण्याची गरज**

नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प अर्थात पोकरा योजनेतील घोटाळा एका शेतकऱ्याने केलेल्या तक्रारीतून सिद्ध झाला आहे. सदर प्रकरणात दोषींवर कारवाई न झाल्यास पोकरा भाग - २ ची सुद्धा अशीच वाट लागणार असून शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसून दलालांची व कर्मचाऱ्यांची घरे भरली जाणार आहेत. यात पडद्याआडून वरिष्ठ अधिकारी सुद्धा नेहमीप्रमाणे हात धुवून घेणार हे निश्चित आहे. शेतकऱ्यांसाठी भूतो न भविष्यातही अशी ही महत्वाकांक्षी योजना केवळ प्रशासनाच्या नाकर्तेपणामुळे भ्रष्टाचाराने पोखरली जात आहे. परिणामी शेतकऱ्यांच्या नावाखाली कृषी विभगतील अधिकारी, कर्मचारी आणि ठराविक दलाल मालामाल होत आहेत. या गंभीर प्रकाराला आळा बसवायचा असेल तर जालना जिल्ह्यात जशी धडक कारवाई करून दोषींची धिंड काढण्यात आली होती. तोच पॅटर्न वाशिम जिल्ह्यात सुद्धा राबविण्याची गरज निर्माण झाली आहे.

**भ्रष्टाचारी थाट, पोकराची लावली वाट**

कारवाई कधी होणार हा प्रश्न अद्यापही गुलदस्त्यातच आहे. त्यामुळे या गैरप्रकरणात उपविभागीय कृषी अधिकारी सुद्धा गुंतले असल्याचा संशय निर्माण होत आहे. रिसोड तालुक्यातील शेलुखडसे येथील गाजलेल्या पोकरा योजनेतील गैरप्रकरणाने कृषी विभागाची लक्तरे वेशीवर टांगली आहेत. सबंधित विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या भ्रष्टाचाराची चिरफाड करणारे हे प्रकरण थेट राज्याच्या मुख्यमंत्र्यापर्यंत पोहचले आहे. मात्र आपल्या विभागाची नामुष्की झाकण्यासाठी वरिष्ठांनी केलेला प्रयत्न कारवाईच्या कसुरातून अधोरेखित होत आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात गैरप्रकार झाला असतांना आणि या गंभीर प्रकरणाचा जिल्ह्यातील सर्वच माध्यमांनी पाठपुरावा करूनही जिल्हा प्रशासन गप्प आहे. ही बाब सबंधित प्रशासनासाठी लज्जास्पद ठरत आहे. सदर प्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई न झाल्यास या घोटाळ्याची एसआयटी नेमून सखोल चौकशी करण्यात यावी अशी मागणी आता जोर धरत आहे.





# सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड

शनिवार, दि. १४ मार्च २०२६ http://epaper.citynewssuperfast.com


# घरगुती गॅस सिलिंडरचा काळाबाजार रोखण्यासाठी नऊ पथके कार्यान्वित

प्रतिनिधी १४ मार्च

◆ जिल्ह्यातील गॅस एजन्सींची करणार तपासणी, पहिल्याच दिवशी सहा ठिकाणांवर धाडी

**अकोला :** शहरातील कोणत्याही गॅस एजन्सीवर गेले तर सकाळपासूनच नागरिकांच्या सिलिंडर घेऊन रांगा लागलेल्या दिसून येतात. यापेक्षाही विपरीत परिस्थिती ग्रामीण भागात आहे. तेथे बहुतांश नागरिकांकडे एकच सिलिंडर असल्याने त्यांना चुली पेटविल्याशिवाय पर्याय नाही. यातच प्रत्येक तालुक्यातून घरगुती गॅसचा मोठ्या प्रमाणात काळाबाजार होत असल्याच्या अनेक तक्रारी येत आहेत. यावर उपाययोजना करण्यासाठी आणि अटकाव आणण्यासाठी ठोस कारवाई करण्याच्या उद्देशाने जिल्हा व शहरात ९ दक्षता व भरारी पथके कार्यान्वित करण्यात आले आहेत. पहिल्याच दिवशी या पथकाने २५ प्रतिष्ठांनाची तपासणी करून सहा ठिकाणी धाडी टाकून आठ सिलिंडर जप्त केले आहेत.



घरगुती गॅस सिलिंडरचा काळाबाजार रोखण्यासाठी जिल्हास्तरावर व तालुका स्तरावर मिळून जिल्हा पुरवठा कार्यालयाचे ९ पथके गठीत करण्यात आलेली आहेत. या पथकामार्फत जिल्यातील एकुण ३४ सर्व गॅस एजन्सीची तपासणी करण्याचे व अकोला जिल्हयाचे कार्यक्षेत्रात घरगुती वापराचे गॅस सिलेंडरवर नियंत्रण तसेच नागरिकांना गॅस सिलेंडरचा पुरवठा / वितरण सुरळीत करण्यासाठी नियोजन करण्याचे याद्वारे आदेशीत करण्यात आलेले आहे. गठीत पथकामार्फत कार्यक्षेत्रातील व्यावसायिक विविध ठिकाणांची तपासणी करण्यात येणार आहे, असे जिल्हा पुरवठा अधिकारी रवींद्र यन्नावार यांनी सांगितले.

### आठ सिलिंडर केले जप्त

जिल्ह्यात व शहरात गठित केलेल्या पथकामार्फत शुक्रवारी २५ व्यावसायिक प्रतिष्ठानांना भेटी दिल्या. या भेटी दरम्यान अवैधरित्या घरगुती वापराचे गॅस सिलेंडर व्यावसायाच्या ठिकाणांवर वापरताना आढळून आल्याने धडक कारवाई करण्यात आली. या कारवाईत ६ ठिकाणांवरून एकुण ८ घरगुती गॅस सिलेंडर जप्तीची कारवाई केली.

### जिल्ह्यात पुरेसा साठा; अनावश्यक गर्दी टाळा

अकोला जिल्ह्यामध्ये घरगुती वापराच्या गॅस सिलिंडरचा साठा पुरेसा आहे. कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये. तसेच अनावश्यक गर्दी गॅस एजन्सीमध्ये करू नये, असे आवाहन जिल्हावासीयांना जिल्हा पुरवठा अधिकारी रवींद्र यन्नावार यांनी केले आहे. तसेच घरगुती गॅस सिलिंडरचा काळाबाजार कोठे होत असल्यास संबंधित कार्यालयास माहिती देण्याचेही आवाहन करण्यात आले आहे.

### गॅस बुकिंग प्रणालीत येत आहेत अडचणी

गॅस बुकिंगसाठी मोठ्या प्रमाणात कॉल येत असल्याने काही ठिकाणी बुकिंग प्रणालीवर ताण येत आहे. त्यामुळे गॅस बुकिंग करताना अडचणी येत आहेत. अनेकांचे बुकिंगच होत नसल्याने नागरिक संतप्त होत आहेत. त्यांनी शांतता राखण्याचे व प्रत्येकांना सिलिंडर मिळेल एवढा साठा आपल्याकडे असल्याचेही जिल्हा पुरवठा विभागाद्वारे सांगण्यात आले आहे.

# अमेरिका–इराण युद्धाची झळ पोहोचली स्वयंपाक घरात

खाद्यतेलाच्या किमती भडकल्या

प्रतिनिधी १४ मार्च

**अकोला :** अमेरिका इराण आणि इसराइल मधील युद्ध थांबण्याचे नाव घेण्यास तयार नाही या युद्धाचा परिणाम संपूर्ण जगाच्या बाजारपेठ वर होत आहे अकोला शहराच्या बाजारपेठेवर सुद्धा याचा थेट परिणाम झाला आहे पुरवठा साखळीतील अडथळे आणि आंतरराष्ट्रीय मालवाहतुकीच्या वाढत्या दरामुळे खाद्य तेलाचे भाव गगनाला भिडले आहेत जवळपास सर्वच खाद्यतेल प्रति टिन २३०० ते २८०० रुपयांपर्यंत पोहोचले आहेत गेल्या दहा दिवसात प्रति टिन २०० ते २५० रुपयांची वाढ झाली आहे.



सोयाबीन आणि सूर्यफूल तेल प्रति टिन २५०० रुपयांच्या पुढे, १० ते १५ टक्के वाढ अपेक्षित



| मुख्य तेलांच्या कि. | वर्तमान भाव | युध्दाच्या आधी | फरक |
|---|---|---|---|
| सोयाबीन तेल | २५००-२५३० | २३२०-२३५० | १८० |
| सूर्यफूल तेल | २६००-२६५० | २४२०-२४५० | १८० |
| पामोलीन तेल | २३२०-२३५० | २२२०-२२५० | १०० |
| मोहरीचे तेल | २५००-२५५० | २४००-२४२० | १०० |
| शेंगदाना तेल | २६७०-२७०० | २६२०-२६५० | ५० |
| तीळ तेल | २८००-२८५० | २७००-२७५० | १०० |

### पुरवठा साखळीला धोका

◆शहरातील व्यापाऱ्यांच्या मते पश्चिम आशियातील तणावामुळे लाल समुद्र आणि सुएझ कालव्यातून होणारा व्यापार धोकादायक बंद आहे शिपिंग कंपन्यांनी त्यांचे समुद्री मालवाहतुकीचे शुल्क वाढवले आहे ज्याचा थेट परिणाम राज्यात येणाऱ्या आयात तेलावर झाला आहे जर हे युद्ध दीर्घकाळ चालू राहिले तर येत्या काही दिवसात किमती आणखी दहा ते पंधरा टक्के वाढू शकतात

### कृत्रिम टंचाईची शक्यता

◆आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील अनिश्चिततेमुळे खाद्यतेलाच्या साठ्याचा तुटवडा निर्माण होत आहे जर लवकरच युद्धबंदी लागू केली नाही तर स्थानिक बाजारपेठेत साठेबाजी आणि कृत्रिम टंचाई निर्माण होऊ शकते अशी माहिती नाव न सांगण्याच्या अटीवर शहरातील एका खाद्यतेलाच्या घाऊक विक्रेत्याने दिली

# शहरात 65 एम.एल.डी. प्लँटवरून होणारा पाणी पुरवठा आता चौथ्या दिवशी

प्रतिनिधी १४ मार्च

**अकोला :** काटेपूर्णा प्रकल्प (महान) येथे १२ मार्च रोजी ३९.०४९ दलघमी एवढा साठा उपलब्ध असून सद्यस्थितीत तापमानात वाढ होत आहे. शहरामध्ये तीव्र उन्हाळा जाणवत आहे. तसेच वाढत्या तापमानामुळे पाण्याची मागणी वाढत आहे. यामुळे दिवसेंदिवस धरणातील पाणीसाठ्यामध्ये लाक्षणिक स्वरुपात घट होत आहे. पाण्याची मागणी आणि होत असलेले वाष्पीभवन लक्षात घेता अकोला महानगरपालिका प्रशसनाव्दारा अकोला शहरात २ दिवसाआड सुरु असलेला पाणी पुरवठा १३ मार्च ४ थ्या दिवशी करण्यात येत आहे. यामुळे ६५ प्लँट वरील महाजनी जलकुंभ, मोठी उमरी, गुडधी जलकुंभ, नेहरु पार्क जलकुंभ, तोष्णीवाल जलकुंभ, आदर्श कॉलनी, जलकुंभ, केशव नगर जलकुंभ, रेल्वे स्टेशन जलकुंभ, गंगा नगर जलकुंभ, अकोट फैल जलकुंभ, जोगळेकर प्लॉट जलकुंभ, लोकमान्य नगर जलकुंभ वरुन होणारा पाणी पुरवठा ३ दिवसआड ४ थे दिवशी करण्यात येणार असल्याबाबतची माहिती पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता अमोल डोईफोडे यांनी दिली आहे. तरी शहरातील नागरिकांनी याची नोंद घेऊन मनपा प्रशासनास सहकार्य करावे. अकोला शहरातील नागरीकांनी पाण्याची पुरेशी साठवणुक करुन पाण्याचा अपव्यय टाळावा असे आवाहन कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा विभाग, मनपा अकोला यांनी केले आहे. यांची सर्व नागरीकांनी नोंद घ्यावी आणि मनपा प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन केले आहे.

# शिवणी, मलकापूर परिसरात गढूळ पाणीपुरवठा !

प्रतिनिधी १४ मार्च

◆ सुधारणा न झाल्यास आंदोलनाचा इशारा

**अकोला :** शहरातील मलकापूर व शिवणी परिसरात गेल्या अनेक दिवसांपासून गढूळ पाणीपुरवठा होत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. दूषित पाण्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला असून पाणीपुरवठ्यात तातडीने सुधारणा करावी, अशी मागणी वंचित बहुजन आघाडीचे यांनी केली आहे.

नागरिक चे नळातून सतत गढूळ व मातीमिश्रित पाणी येत असल्याची तक्रार आहे. त्यामुळे पिण्यायोग्य पाणी मिळत नसल्याने नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. अनेकांना पिण्यासाठी वेगळे पाणी विकत घ्यावे लागत आहे. गढूळ पाणीपुरवठ्यामुळे पोटाचे आजार, अतिसार,



ताप यांसारख्या आजारांचा धोका वाढू शकतो, अशी भीतीही नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे. त्यामुळे पाणीपुरवठा विभागाने तातडीने या समस्येकडे लक्ष देऊन पाणीपुरवठा सुरळीत करावा, अशी मागणी करण्यात येत आहे.

परिसरातील नागरिकांनी यांनी सांगितले की, शिवनी व मलकापूर परिसरातील नागरिकांकडून सातत्याने तक्रारी येत आहेत. या भागात स्वच्छ व नियमित पाणीपुरवठा होणे अपेक्षित असताना नागरिकांना गढूळ पाणी मिळत आहे. ही बाब अत्यंत गंभीर असून मनपा प्रशासनाने तातडीने यावर उपाययोजना करावी. तसेच पाणीपुरवठा विभागाने त्वरित पाईपलाईनची तपासणी करून गढूळ पाणीपुरवठ्याचे कारण शोधावे आणि समस्या कायमस्वरूपी सोडवावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. अन्यथा पाणीपुरवठा विभागाविरोधात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही परिसरातील नागरिकांनी केला आहे यांनी दिला आहे.

# शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या 'टीएमटी'च्या संचालकास अटक

प्रतिनिधी १४ मार्च


◆ आरोपीस १५ मार्चपर्यंत पोलिस कोठडीत


**अकोला :** आर्थिक गुंतवणुकीच्या आमिषाने शेकडो नागरिकांसह एकाच गावातील जवळपास ७० टक्के शेतकऱ्यांची कोट्यवधी रुपयांनी फसवणूक करणाऱ्या 'टीएमटी' नावाच्या कथित शेअर बँक व पतसंस्थेचा संचालक तुषार ताकझुरे याला अखेर पोलिसांनी अटक केली आहे. स्थानिक आर्थिक गुन्हे शाखेने ही कारवाई केली असून, त्याला न्यायालयात हजर केले असता १५ मार्चपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे.

अकोला शहरातील गंगानगर परिसरात 'टीएमटी' नावाने शेअर बँक सुरू करून तुषार ताकझुरेने नागरिकांना आकर्षक योजनांचे आमिष दाखवले होते. '६० हजार रुपये गुंतवा आणि दरमहा ६ हजार रुपयांचा किराणा मोफत घ्या' अशा भुलथापांच्या जाहिराती देत त्याने मोठ्या परताव्याचे आश्वासन दिले. कमी कालावधीत जास्त नफा मिळेल, असे सांगून अनेकांना गुंतवणूक करण्यास प्रवृत्त केले. या आकर्षक योजनांच्या जाळ्यात अडकून शेकडो गुंतवणूकदारांनी कोट्यवधी रुपयांच्या ठेवी या संस्थेत जमा केल्या. सुरुवातीला काहींना परतावा देऊन विश्वास संपादन करण्यात आला. मात्र, नंतर अचानक व्यवहार बंद करून ताकझुरेने गुंतवणूकदारांना टाळाटाळ सुरू केली. गुंतवणूकदारांच्या तक्रारीनंतर आर्थिक गुन्हे शाखेने या प्रकरणाचा तपास सुरू केला. तपासाची चक्रे वेगाने फिरवत पोलिसांनी तुषार ताकझुरेला अटक केली. न्यायालयात हजर केल्यानंतर त्याला १५ मार्चपर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली. या प्रकरणात आणखी काही साथीदारांचा सहभाग असण्याची शक्यता वर्तवली जात असून, पोलिसांकडून त्यांचा शोध घेतला जात आहे. तसेच फसवणुकीची नेमकी रक्कम किती आणि किती गुंतवणूकदार यामध्ये अडकले आहेत, याचाही सखोल तपास सुरु आहे.

# कार्डिन डायरेक्ट फॅक्टरी सेल लोकांच्या आग्रहामुळे आता 20 मार्चपर्यंत सुरू राहणार

सणासुदीसाठी माफक दरात भरपूर स्टॉक




प्रतिनिधी १४ मार्च

**अकोला :** सर्व फॅशन प्रेमी महिला, पुरुष आणि तरुणाईमध्ये सध्या 'कार्डिन' कंपनीच्या सेलची जोरदार चर्चा सुरू आहे. या सेलला शहरवासीयांचा इतका उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे की, ग्राहकांच्या आग्रहाखातर हा सेल आता २० मार्च पर्यंत वाढवण्यात आला आहे.

लग्नसराई आणि सणासुदीची मालिका लक्षात घेता, शहराच्या अमृतवाडी येथे कार्डिन कंपनीचा हा शानदार 'डायरेक्ट फॅक्टरी सेल' सुरू आहे. फॅशनच्या दुनियेत कार्डिन ब्रँडचे नाव आदराने घेतले जाते, विशेषतः तरुणांमध्ये या ब्रँडेड कपड्यांची मोठी क्रेझ आहे. विशाल रेंज एकाच छताखाली उपलब्ध आहे. जीन्स पँट, टी-शर्ट, फॉर्मल शर्ट आणि पँट, १००३ कॉटन शर्ट, स्टायलिश ट्राउझर आणि लग्नसराईसाठी खास आकर्षक कुर्ते उपलब्ध. महिलांसाठी खास साड्यांचे कलेक्शन जसे कांजीवरम, बनारसी, पैठणी, गडवाल, मंगलागिरी आणि कांचीपट्टू अशा विविध प्रकारच्या साड्यांचा समावेश आहे. ७५० ते १५०० रुपयांच्या साड्या येथे फक्त २५०, ३०० आणि ३५० रुपयांत उपलब्ध! पुरुषांच्या कपड्यांवर विशेष 'बाय मोर, गेट मोर' ऑफर आहे. एक कपडा खरेदी करा एक फ्री मिळवा, दोन कपडे खरेदी करा तीन फ्री मिळवा, तीन कपडे खरेदी करा पाच फ्री मिळवा. सेलच्या पहिल्या दिवसापासूनच ब्रँडेड कपडे इतक्या स्वस्त दरात मिळत असल्याने ग्राहकांची झुंबड उडाली आहे. अत्यंत रास्त दरात मनपसंद खरेदी करण्याची ही सुवर्णसंधी गमावू नका. स्टॉक संपण्यापूर्वीच अमृतवाडी येथील सेलला भेट द्या आणि आपल्या आवडीच्या कपड्यांची मनसोक्त खरेदी करा, असे आवाहन कार्डिन सेलतर्फे करण्यात आले आहे.

# सिलिंडर बुकिंगचे नंबर 'बंद'!

प्रतिनिधी १४ मार्च

**अकोला :** शहरासह तालुका स्तरावरील नागरिक सिलेंडर साठी धावाधाव करीत असतानाच आता आता बुकिंग आणि केवायसी साठी नागरिकांना वेठीस धरण्यात येत आहे. बुकिंगसाठी असणारा नंबर बंद दाखवित असल्यामुळे नागरिकांना प्रचंड वैताग सहन करावा लागत आहे.

बुकिंग नंबर लागत नसल्याच्या असंख्य तक्रारी जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्याकडे करण्यात आल्या आहेत. तसेच नागरिक संबंधित एजन्सीवर जाऊन विचारपूस करीत आहेत. मात्र त्यांना उडवाउडवीची उत्तरे देण्यात येत आहेत. यामुळे ग्राहकांचा संताप वाढत असून, वादाचेही प्रसंग निर्माण होत असल्याने वेळ प्रसंगी पोलिसांनाही पाचारण करण्यात येत आहे.

# महिला दिन व रंगपंचमी निमित्त देशमुख महिला मंडळाचा स्तुत्य उपक्रम...

◆ एसटी महिला कर्मचारी व महिला ऑटोचालकांचा सत्कार; होळीचा रंगोत्सव उत्साहात



प्रतिनिधी १४ मार्च

**अकोला :** जागतिक महिला दिना निमित्त देशमुख महिला मंडळाच्या वतीने विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात समाजात मेहनत व कर्तृत्वाने आपले स्थान निर्माण करणाऱ्या एसटी महिला कर्मचारी तसेच महिला ऑटोचालकांचा सत्कार करून त्यांना सन्मानित करण्यात आले. या क्षेत्रात कार्यरत असलेल्या महिलांच्या परिश्रमाचे व धैर्याचे उपस्थितांनी कौतुक केले.यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्ष राजश्रीताई देशमुख, प्रमुख पाहूण्या झोन सभापती तथा नगरसेविका सौ. निकिता राहूल देशमुख, ज्येष्ठ सल्लागार कविताताई, उपाध्यक्ष नयनाताई, सचिव स्वप्नाली ताई, माजी अध्यक्ष कल्पनाताई सह कोषाध्यक्ष सीमा ताई या मंचावर उपस्थित होत्या.

कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमा पूजन व दीप प्रज्वलनाने करण्यात आली त्यानंतर उपस्थित सत्कारमूर्तींचा स्वागत सोहळा मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला यामध्ये महिला ऑटो चालक अश्विनी पाचपोर सह सारिका चांदुरकर ,उषा सातपुते, बबीता मोरे,समता जामनीक, वर्षा खंडाळकर,संगीता टिचकूले, वैशाली मुरादे, वर्षा चोपडे,कल्पना सोनोने,दिपाली सोनोने,उज्ज्वला लाखे,इत्यादी सत्कारमूर्तींचा शाल श्रीफळ भेटवस्तू व झाड देऊन सन्मान करण्यात आला.अशा या बहारदार कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्वेता देशमुख यांनी तर आभार प्रदर्शन शितल देशमुख यांनी केले.उपस्थित सर्वांसाठी बलून गेम घेऊन जिंकलेल्या स्पर्धकांना बक्षीस वितरित करण्यात आले. शेवटी कार्यक्रमाला रंगत आणली ती वर्षा संजय देशमुख यांनी,' हसी के फवारे ' प्रस्तुत करीत आपल्या बहारदार शैलीने सर्वांची मने जिंकली व सत्कारमूर्तीसह सर्वांनी रंगोत्सवाचा व रुचकर मेजवानीचा आनंद घेतला.

आजच्या काळात महिला प्रत्येक क्षेत्रात कर्तृत्वाचा ठसा उमटवत समाजासाठी प्रेरणादायी कार्य करत आहेत.एसटी सेवा असो वा ऑटोचालकाचे धाडसी काम, महिलांनी आपल्या मेहनतीने आणि जिद्दीने समाजात नवे आदर्श निर्माण केले आहेत.कष्ट, धैर्य आणि आत्मविश्वासाच्या बळावर महिलांनी प्रत्येक अडथळा पार करत आपले वेगळे स्थान निर्माण केले आहे.अशा कर्तृत्ववान महिलांचा सन्मान करणे म्हणजे समाजातील स्त्रीशक्तीचा गौरवच होय. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी देशमुख महिला मंडळाच्या सर्व सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमातून महिलांच्या सन्मानाचा आणि एकोप्याचा संदेश समाजात देण्यात आला.


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क –** 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135


CMYK CMYK